आनंद सागर मंगल कार्यालय
शाकाहारी करिता
एका मंगलमय कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली. आता आनंद सागर मंगल कार्यालय येथे रात्रीच्या कार्यक्रमासाठी भव्य लॉन्स उपलब्ध.
* लग्न सोहळा * साखरपूडा * रिसेप्शन * वाढदिवस
* गेट टुगेदर * कॉन्फरन्स * सांस्कृतिक कार्यक्रम
आसना बायपास चौरस्ता, गोरक्षण, जवळ, देशमुख गॅस पंपासमोर कामठा (बु.) नांदेड
व्यवस्था: स्वागत मंडप डेकोरेटर्स, मो. 9325610507,7972904719

# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

* वर्ष ६५ वे * अंक ५२ * नांदेड * मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

डॉ.सौ.प्रियंका सचिन सूर्यवंशी
M.B.B.S, M.D. DERMATOLOGIST, VENEREOLOGIST, LEPROSY (SAFDURJANG DELHI)
श्री सिद्धिविनायक स्कीन क्लिनीक
उपचार सुविधा उपलब्ध
त्वचारोग, गुप्तरोग, कुष्ठरोग, केस, सौंदर्य, लेजर उपचार तज्ञ
Treatment Facilities Available
Skin | Nail | Hair
Laser | Cosmetic
पत्ता :- SBI बँक समोर, गोविंदराज कॉम्प्लेक्स, तोष्णीवाल हॉस्पिटलच्या जवळ, राधेश्याम लाहोटी मेडिकल च्या बाजूला, डॉक्टर लेन-2, नांदेड.
अपॉइंटमेंट मोबाईल
8999337277 | 9405672222 | 9850300575

# विधीमंडळ अधिवेशनात अजितदादांना श्रद्धांजली

## अजितदादा न लाभलेला बेस्ट मुख्यमंत्री -देवेंद्र फडणवीस

**मुंबई (प्रतिनिधी)** – वक्तशीरपणा आणि घडाळ्याच्या काट्यावर चालणाऱ्या अजितदादांनी यावेळी मात्र टायमिंग चुकवलं. खऱ्या अर्थाने ज्यावेळी खूप मोठी इनिंग खेळतील असं सर्वांनाच दिसत होतं त्यावेळी मात्र अजितदादांनी जीवनाच्या वेळेचं टायमिंग चुकवलं. अजितदादा सर्वाधिक ६ वेळा उपमुख्यमंत्री राहिले आहेत. पण अनेकवेळा ते म्हणायचे की, मी कधीतरी मुख्यमंत्री होईल, मात्र यावेळी देखील उपमुख्यमंत्री मीच राहील, असेही ते गमतीने म्हणायचे. मात्र आज मी हक्काने म्हणू शकतो की, 'अजितदादा पवार वॉज द बेस्ट चीफ मिनिस्टर महाराष्ट्र नेव्हर हॅड'.

अजित दादांच्या रूपानं एक चांगला मुख्यमंत्री महाराष्ट्राला मिळू शकला असता, ते आता नसणार आहे. मला विश्वासही होता की, नियतीने त्यांना ती संधी दिली असती, ती क्षमता त्यांच्यात होती. महाराष्ट्रात वसंतदादा आणि अजितदादा हे दोन दादा कायम महाराष्ट्राच्या स्मरणात राहतील अशा शब्दात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. आजपासून सुरु झालेल्या राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी अजितदादा पवार यांच्यासह दिवंगत सदस्यांना आदरांजली वाहण्यासाठी शोक प्रस्ताव मांडण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

पोकळी या शब्दाची व्याप्ती काय असते हे आज मला कळतंय, कारण असे अजितदादा पुन्हा होऊ शकत नाही. शिवाय ही पोकळीही कोणी भरून काढू शकत नाही. खऱ्या अर्थानं अजितदादांचे अकास्मात निधन हे सर्वांना धक्का देणारं आहे. सकाळी सहा वाजल्यापासून काम करणारा नेता अशी त्यांची ख्याती होती. प्रत्येक गोष्टीचं नियोजन, सखोल अभ्यास आणि सेकंदाचाही सदुपयोग करणारा नेता म्हणून अजित दादांकडे बघितलं जायचं. ते खऱ्या अर्थानं माझे दादाच होते. २०१४ नंतर आमची जवळीक झाली आणि ती जवळीक शेवटपर्यंत कायम राहिली, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

अजितदादांचं व्यक्तिमत्व हे केवळ एक व्यक्ती नव्हते तर एका पिढीचा विश्वास होते. त्यांच्या अपघाताची बातमी सर्वप्रथम आली तेव्हा असं वाटलं की, अपघात झाला असेल त्यात थोडंफार काही झालं असेल. मात्र नंतर दुसरी बातमी आली तेव्हा धक्काच बसला. मातीतून तयार झालेलं नेतृत्व अजितदादांचं होतं. ते कधीही कुणापुढे झुकले नाही. मात्र जेव्हा आपली चूक झाल्याचे लक्षात आलं तर ते जाहीर माफी मागायलाही डगमगले नाही, हेही लक्षात घेण्यासारखं होतं. अनेक टीका आणि विरोधाला समोर जावं लागलं असताना देखील त्यांनी संकटांना पाठ दाखवली नाही. त्यांच्या स्वभावात पारदर्शकता होती. शब्दाला, वेळेला जगणारा आणि एकवचनी अशी दादांची ओळख होती, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## तृणमूल काँग्रेसचे संस्थापक मुकुल रॉय यांचे निधन

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – माजी रेल्वे मंत्री आणि तृणमूल काँग्रेसचेसंस्थापक सदस्य मुकुल रॉय यांचे वयाच्या ६९ व्या वर्षी निधन झाले. मुकुल रॉय यांचे सोमवार, दि. २३ फेब्रुवारी रोजी पहाटे दीड वाजता वाजता कोलकातामधील अपोलो रुग्णालयात हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते गेल्या काही वर्षांपासून स्मृतिभ्रंश आणि इतर अनेक आरोग्य समस्यांशी झुंज देत होते. निधनापूर्वी काही दिवस ते कोमात होते. त्यांना अन्ननलिकेद्वारे द्रव आहार दिला जात होता.

मुकुल रॉय यांच्या संघटनात्मक कौशल्यामुळे त्यांना 'बंगालच्या राजकारणाचे चाणक्य' म्हणून ओळखले जात असे. १९९८ मध्ये तृणमूल काँग्रेसच्या स्थापनेत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती आणि ते ममता बॅनर्जी यांचे अत्यंत विश्वासू सहकारी मानले जात. यूपीए-२ सरकारच्या काळात त्यांनी जहाजबांधणी राज्यमंत्री आणि मार्च ते सप्टेंबर २०१२ दरम्यान केंद्रीय रेल्वे मंत्री म्हणून काम पाहिले.

### नागपुरातील बारावी पेपरफुटी प्रकरणी कारवाई

## कोचिंग क्लास चालकासह एका विद्यार्थ्याला अटक, मोठं रॅकेट उघड होण्याची शक्यता

**नागपूर (प्रतिनिधी)** – शहरात बारावी उच्च माध्यमिक परीक्षेतील पेपर फुटल्याच्या धक्कादायक प्रकारामुळे शैक्षणिक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. बारावीच्या दोन पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाअंती आता दोघांना अटक करण्यात आली आहे. कोचिंग क्लास चालकासह एका विद्यार्थ्याला या प्रकरणी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. राज्याला हादरविणाऱ्या या पेपर फुटीच्या प्रकरणात नागपुरातून मोठी कारवाई करण्यात आली असून, सदर पोलिसांकडून अद्याप या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, निशिकांत मूल (४५, मानकापूर) असं ट्युशन क्लासेस चालवणाऱ्या संचालकाचे नाव आहे. तर फरहान अख्तर असं अटक करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे नाव आहे. सेंट उर्सुला हायस्कूल परीक्षा केंद्रावरील पर्यवेक्षकामुळे हा प्रकार उघड झाला होता. यात रसायनशास्त्राच्या पेपरच्या वेळेपूर्वीच व्हॉट्सॲपवर प्रश्नपत्रिका आल्याचे पुढं आलं होतं. दरम्यान, वारंवार प्रसाधनगृहात गेलेल्या विद्यार्थिनीवर संशय आल्याने तिची झडती घेतली असता स्मार्टफोन आढळून आला. त्यानंतर हा मोबाईल जप्त करत तपासणी केली असता मोबाईलमध्ये परीक्षा सुरू होण्यापूर्वीच १०.३७ ला पेपर, प्रश्नांसोबत उत्तरेही एका व्हॉट्सॲप ग्रुपवर आढळून आले. 'XII' नावाच्या २१ सदस्यांच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर निशिकांत मूलच्या क्रमांकावरून पेपर पाठवल्याचे उघड झालं. यात बारावीच्या विज्ञान शाखेचे फिजिक्स आणि केमिस्ट्रीचा पेपर परीक्षेच्या तासाभरापूर्वीच व्हाट्सअपवर आल्याची माहिती आहे. गुरुवारी बारावी केमिस्ट्रीचा पेपर होता. मात्र परीक्षेआधी पेपर विद्यार्थ्यांच्या व्हाट्सअप ग्रुपवर आला होता. नागपूर शहरातील सदरच्या सेंट उर्सुला परीक्षा केंद्रावर हा प्रकरण उघडकीस आला आहे.

दरम्यान प्रकरण उघड होताच तो क्रमांक निशिकांत मूल याने बंद केला. १६ फेब्रुवारीचा फिजिक्स पेपरही मोबाईलमध्ये सापडला होता. या दोन्ही विषयांची पेपरफुटीची पुष्टी पोलिसांकडून करण्यात आली असून कोचिंग क्लास चालकासह एका विद्यार्थ्याला या प्रकरणी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. फरहानने ग्रुपवर उत्तरं टाकल्याचा आरोप आहे. तर या प्रकरणी दोघांना न्यायालयाकडून चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. अशातच हि प्रश्नपत्रिका नेमकी कुठून आली? यात आणखी कोणाचा सहभाग आहे? याचा तपास पोलिसांकडून सुरु करण्यात आला आहे.

## अवकाळीचा जिल्ह्याला तडाखा; कापणीला आलेला गहू आणि हरभरा आडवा, शेतकरी चिंतातूर

**नांदेड (प्रतिनिधी)**– हवामान खात्याने नुकताच अवकाळी पावसाचा अंदाज वर्तविला होता. तो खरा ठरला असून, नांदेड शहरासह जिल्ह्यातील काही भागास रविवारी रात्री उशिरा आणि सोमवार, दि. २३ फेब्रुवारी रोजी दुपारी अवकाळी पावसाचा तडाखा बसला. जोरदार वाऱ्यासह झालेल्या पावसाने रब्बी हंगामातील पिकांचे मोठे नुकसान झाले. यात कापणीला आलेला गहू, काढणीला आलेला हरभरा यासोबतच आंबा या फळाची आणि फुल शेतीचे मोठे नुकसान झाले आहे.

वातावरणातील बदलामुळे मराठवाड्यासह जिल्ह्यात दि. २३ फेब्रुवारीपासून अवकाळी पाऊस होईल असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला होता. तो पहिल्याच दिवशी खरा ठरला. नांदेड शहरातील काही भागात सोमवारी पहाटेच्या सुमारास पावसाचा शिडकावा झाला. दिवसभर आभाळ गच्च भरून आले होते. जोराच्या वाऱ्यामुळे शहरातील काही भागात भारनियमन करण्यात आले होते. तर अनेक ठिकाणी होर्डिंग्ज तर ग्रामीण भागातील अनेक घरांवरती पत्रे उडाली. सायंकाळी ४ वाजता पुन्हा पावसाची रिमझिम सुरू झाली. तो बराच वेळ सुरू होता. यामुळे उकाड्यापासून काही वेळ नागरिकांची सुटका झाली. तर दुसरीकडे जिल्ह्यातील ग्रामीण भागात दुपारी वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला.

हिमायतनगर, माहूर, लोहा, कंधार, किनवट, नांदेड, हदगाव यासह अन्य काही तालुक्यात झालेल्या अवकाळी पावसाने चांगलाच तडाखा दिला. यामुळे कापणीला आलेला गहू, हरभरा, ज्वारी, करडी यासह अन्य पिकांचे मोठे नुकसान झाले. अनेक शेतामधील पिके जागेवर आडवी झाली. यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. पुढील आणखी काही दिवस अवकाळी पावसाचा मुक्काम राहण्याची शक्यताही हवामान खात्याने वर्तविली आहे, यामुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावर चिंतेचे ढग कायम राहणार आहेत.

## अजितदादांच्या शोक प्रस्तावावर बोलताना रोहित पवारांना अश्रू अनावर

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली आहे. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव विधानसभेत मांडण्यात आला. या शोकप्रस्तावावर बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार भाऊक झाले. शोक प्रस्तावावर बोलत असताना रोहित पवार यांचा कंठ दाटून आला. त्यांच्या डोळ्यांमध्ये पाणी आलं. त्यांचा आवाज कापरा झाला. ते प्रचंड भाऊक झाले. त्यांचं शोकप्रस्तावावरच्या भाषणाने सभागृहात प्रत्येक सदस्याला भाऊक केलं.

## ५० टक्के आरक्षण ओलांडलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समित्यांची निवडणूक लांबणीवर, सुप्रीम कोर्टाचा निर्णय

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – राज्यातील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास सुप्रीम कोर्टानं मनाई केली आहे. राज्यात आता २२ जिल्हा परिषदा आणि त्यांअतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित राहणार आहेत. महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रलंबित निवडणूक घेण्यास परवानगी देण्याची मागणी राज्य सरकारकडून करण्यात आली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयानं उर्वरित जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यास मनाई केली आहे.

राहुल रमेश वाघ विरुद्ध केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार या मूळ याचिकेवर सुनावणी झाली. बांठिया समितीच्या अगोदर जी स्थिती होती त्यानुसार निवडणूक घेण्याचे आदेश सुप्रीम कोर्टानं दिले होते. राज्य निवडणूक आयोगानं आरक्षण निश्चिती करताना ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेली होती. काही ठिकाणी निवडणुका देखील पार पडल्या. २२ जिल्हा परिषद आणि या जिल्ह्यांमधील पंचायत समितीत आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडली गेली होती. त्यामुळं या ठिकाणच्या निवडणुका घेण्यास स्थगिती देण्यात आली होती. राज्य निवडणूक आयोगानं १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका पार पडलेल्या आहेत. उर्वरित २२ जिल्हा परिषदांच्या आणि उरलेल्या पंचायत समित्यांच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहण्याची शक्यता आहे.

राज्यातील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर सर्वोच्च न्यायालयानं मनाई कायम ठेवली आहे. राज्य सरकारच्यावतीनं तुषार मेहता यांनी अंतिम आदेशाच्या अधीन राहून निवडणूक घेण्यास परवानगी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र, सुप्रीम कोर्टानं अशी परवानगी देता येणार नसल्याचं म्हटलं.

## माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांना 'नांदेड भूषण' पुरस्कार प्रदान

**नांदेड (प्रतिनिधी)** – राज्य आणि देशपातळीवर विविध जबाबदाऱ्या पार पाडताना अनेक सन्मान मिळाले, तरी आपल्या मातीत, आपल्या लोकांकडून मिळणारा सन्मान हा कोणत्याही मोठ्या पुरस्कारापेक्षा श्रेष्ठ असतो, असे मनोगत 'नरेंद्र-देवेंद्र महोत्सवा'त पंडीत दीनदयाल उपाध्याय स्मृती प्रतिष्ठान तर्फे 'नांदेड भूषण' पुरस्कार मिळाल्यानंतर माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी व्यक्त केले.

शहरातील नवा मोंढा मैदानात चंद्रभागा केरबा गंजेवार नगरी, कुबेरनगरी, मौजे लोंढेसांगवी प्रस्तुत 'नरेंद्र देवेंद्र महोत्सवा'त टाळ्यांच्या गजरात हा भव्य सन्मान सोहळा पार पडला. यावेळी उपस्थित नागरिकांच्या टाळ्यांच्या कडकडाटात ते म्हणाले की, माझ्याच गावात, माझ्याच लोकांनी केलेला हा सन्मान माझ्यासाठी अत्यंत मोलाचा आहे. नांदेडकरांनी मला मनापासून दिलेली ही पावती आहे.

संत बाबा बलविंदरसिंघजी यांच्या हस्ते स्मृती चिन्ह, मानपत्र, महावस्त्र व रोख रू. ११००० देऊन खा. चव्हाण यांना नांदेड भूषण देण्यात आला. स्वागतध्यक्ष शिवप्रसाद राठी यांनी व्यासपीठावर उपस्थित माजी मंत्री डी. पी. सावंत, भाजपा शहराध्यक्ष अमर राजूरकर, महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय लहानकर, किशोर स्वामी, भुजंगराव पाटील डख, डॉ. अंकुश देवसरकर, ॲड. महेश कनकदंडे, प्रवीण साले, सतीश शर्मा, सुरेश लोट, अंबादास लालपोतू, दिलीपसिंग हजारी, सतीश देशमुख, संजय रातोळीकर यांचा सत्कार केला.

KC FASHION MALL
पवित्र बंधनाच्या प्रत्येक क्षणी...
SBI बँके जवळ, छत्रपती शिवाजीनगर नांदेड. | 7030223399

## शेळगावकर यांनी शेती संदर्भात लोकप्रतिनिधींना मार्गदर्शन करावे -माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)** – निष्कामसेवा करणाऱ्या माधवराव पाटील शेळगावकर यांनी आपले उर्वरित आयुष्य लोकनियुक्त प्रतिनिधींनी सभागृहात काय मांडावं यावर मार्गदर्शन करण्यासाठी खर्ची घालावे आणि शेतीमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी मार्गदर्शक सुचना कराव्यात, असे आवाहन महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा सदस्य खा. अशोकराव चव्हाण यांनी केले आहे.

ज्येष्ठ समाजसेवक तथा महाराष्ट्र राज्य ग्रामस्वच्छता समितीचे सर्वप्रथम अध्यक्ष स्वच्छतादूत माधवराव पाटील शेळगावकर यांच्या 'माझी ग्रामविकासाची शेती' या निर्मल प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या ग्रंथ प्रकाशन व माधवराव पाटील शेळगावकर गौरव सोहळ्यात ते बोलत होते. माजी शिक्षण मंत्री कमलकिशोर कदम यांच्या अध्यक्षतेखाली शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात संपन्न झालेल्या सोहळ्याचे प्रास्ताविक प्राचार्य संजय पाटील शेळगावकर, मानपत्राचे लेखन व वाचन इंजि. शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी केले तर आभार प्रदर्शन इंजि. बळवंत पाटील यांनी केले.

यावेळी माजी मंत्री डॉ. माधवराव पाटील किन्हाळकर, डी. पी. सावंत, नांदेड लोकसभा सदस्य खा. प्रा. रविंद्र चव्हाण, कृषीमुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष आ. हेमंत पाटील, आ. बाबुराव कदम कोहळीकर, आ. आनंदराव बोंढारकर, आ. बालाजी कल्याणकर, माजी आ. शंकरअण्णा धोंडगे, माजी आ. हनुमंत पाटील बेटमोगरेकर, ग्रामविकास विभागाचे माजी सचिव मल्लिनाथ कलशेट्टी, पूर्व शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे, निर्मलग्रामचे पुरस्कार विजेते चंदू मारकवाड, गुणवंत पाटील हंगरगेकर, शिरीष देशमुख गोरठेकर, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोगरेकर, माजी जि. प. सदस्य पुनमताई राजेश पवार, प्रवीण पाटील चिखलीकर, प्रवीण साले, किशोर स्वामी, डॉ. संजय कदम, मराठा सेवा संघाचे कामाजी पवार, प्राचार्य डॉ. पंजाबराव चव्हाण, माजी महापौर जयश्री पावडे, उपमहापौर आनंद चव्हाण, संगमेश्वर लांडगे, प्रा. प्रभाकर पवार, मारोतराव कवळे गुरुजी, दिलीप धर्माधिकारी, राजेश देशमुख कुंटूरकर, सोपान क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्रातील अनेक प्रज्ञाप्रतिभावंतांची उंची त्यांच्या भागात जाऊन वाढविण्याचे महत्त्वाचे काम माधवराव पाटील शेळगावकर यांनी केले असून त्यांच्या स्पष्टवक्तेपणा व निर्भिड बाण्यामुळेच मोठ्या राजकीय संधींपासून त्यांना जाणिवपूर्वक वंचित ठेवण्यात आल्याचे पाशा पटेल यांनी नमूद केले तर मल्लिनाथ कलशेट्टी यांनी भारत देशातील स्वच्छ भारत मिशनचे प्रणेते माधवराव पाटील शेळगावकर हेच असल्याचे सांगितले.

माझी ग्रामविकासाची शेती या आत्मचरित्राची पाठराखण करणारे न्या. भीमराव नरवाडे पाटील यांनी म्हटल्याप्रमाणे आपलं जीवन ग्रंथासारखे वाचनीय करणारे आणि महात्मा गांधीप्रमाणे आपले जीवन हाच आपला संदेश अशी कार्यप्रणाली अंगिकारणारे माधवराव पाटील शेळगावकर यांचे आत्मचरित्र येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणादायी दिपस्तंभ असल्याचे डॉ माधवराव पाटील किन्हाळकर यांनी सांगितले.

(पान ३ वर)

## महाराष्ट्राला अवकाळीने झोडपले; राज्यातील अनेक जिल्ह्यांना यलो अलर्ट

**मुंबई (प्रतिनिधी)** – महाराष्ट्रात मागील काही दिवसांपासून हवामानात पुन्हा एकदा वेगाने बदल होत असून, विदर्भातील नागपूर, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांमध्ये रविवारी मध्यरात्रीपासून विजांच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस कोसळला. हवामान विभागाने आज आणि उद्या राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा अंदाज वर्तवला असून, मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये 'येलो अलर्ट' जारी करण्यात आलेला आहे.

हवामाना विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव यांसह विदर्भातील गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता असून 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्रातील सोलापूर व निफाड परिसरातही ढगाळ वातावरण असून हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

रविवारी मध्यरात्रीनंतर नागपुरात वादळी पावसाने अचानक हजेरी लावली. दिवसभर उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला; मात्र सोबतच वाऱ्याच्या जोरदार झोतांमुळे शहरातील काही भागांत वीजपुरवठा खंडित झाला. हवामान विभागाने सुरुवातीला पावसाचा अंदाज केवळ गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यांपुरता वर्तवला होता. रविवारी संध्याकाळपर्यंत या अंदाजाची व्याप्ती वाढवत यवतमाळपर्यंत वादळी पावसाची शक्यता दर्शविण्यात आली. नागपुरात मात्र केवळ ढगाळ वातावरण राहण्याचा अंदाज होता.

तथापि, मध्यरात्रीनंतर अचानक ढगांचा गडगडाट सुरू झाला आणि जोरदार वाऱ्यासह पावसाची सर कोसळली. काही ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटल्याच्या किरकोळ घटना घडल्या. विजेच्या तारा व उपकरणांवर परिणाम झाल्याने शहरातील काही भागांत तात्पुरता वीजपुरवठा खंडित झाला.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# भारत-फ्रान्स करार: अमेरिकेला झटका

जग सध्या भू-राजकीय अस्थैर्य, युद्धांचे सावट, पुरवठा साखळीतील तुटवडा आणि तंत्रज्ञानातील स्पर्धा अशा अनेक आव्हानांतून जात आहे. अशा काळात भारत आणि फ्रान्स या दोन लोकशाही राष्ट्रांनी द्विपक्षीय संबंधांना विशेष जागतिक सामरिक भागीदारीचा दर्जा देत २१ करारांवर स्वाक्षऱ्या करणे, हे केवळ औपचारिक राजनैतिक पाऊल नसून जागतिक स्थैर्यासाठी महत्त्वाचा संदेश देणारे आहे. अमेरिकेच्या मनमानी, अविवेकी आणि अनियंत्रित कारभाराचा होत असलेला जागतिक परिणाम लक्षात घेऊन अमेरिकेवरील अवलंबित्व कमी करण्याच्या दृष्टीने भारत व फ्रान्स यांच्यात झालेला हा करार एक नवी दृष्टी देतो. एवढेच नव्हे तर अमेरिकेला ही एक चपराकच आहे. आपण सहकार्य नाही केले तरी भारताचे काही बिघडत नाही हा संदेश या कराराच्या मार्फत आतून अमेरिकेला पोहोचला आहे. म्हणूनच मुंबईत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉन यांच्यात झालेली चर्चा भारताच्या दीर्घकालीन सामरिक दृष्टिकोनाची साक्ष देते. भारत-फ्रान्स संबंधांचा पाया विश्वासावर उभा आहे. संरक्षण क्षेत्रातील सहकार्य हे त्याचे प्रमुख उदाहरण. 'राफेल' लढाऊ विमानांपासून पाणबुड्यांपर्यंत दोन्ही देशांचे सहकार्य सातत्याने विस्तारत आले आहे. याच पार्श्वभूमीवर भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड आणि फ्रेंच संरक्षण कंपनी साफ्रण यांच्यात 'हॅमर' क्षेपणास्त्रांच्या भारतातील उत्पादनासाठी झालेला संयुक्त उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरतो. यामुळे भारताचा संरक्षण उत्पादनातील आत्मनिर्भरतेकडे जाणारा प्रवास अधिक वेगवान होईल, तसेच 'मेक इन इंडिया'ला बळ मिळेल. या भेटीतील आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे कर्नाटकातील वेमगल येथे देशातील पहिल्या खासगी क्षेत्रातील हेलिकॉप्टर असेंब्ली लाइनचे उद्घाटन. टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टिम्स आणि एअरबस यांच्या संयुक्त उपक्रमातून येथे एच-१२५ लाइट युटिलिटी हेलिकॉप्टरचे उत्पादन होणार आहे. २०२७ पर्यंत पहिले 'मेड इन इंडिया' हेलिकॉप्टर तयार होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. विशेष म्हणजे माउंट एव्हरेस्टच्या उंचीपर्यंत उड्डाण करू शकणारे जगातील एकमेव हेलिकॉप्टर भारतात तयार होणार असल्याचे पंतप्रधानांनी जाहीर केले. हे केवळ तांत्रिक यश नसून भारताच्या औद्योगिक क्षमतेचा जागतिक पातळीवरील आत्मविश्वास दर्शवणारे पाऊल आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीनेही हा दौरा महत्त्वाचा ठरतो. पुण्यात भारतीय वायुदल आणि नौदलासाठी उत्पादन व देखभाल कार्यासाठी 'सेंटर ऑफ एक्सलन्स' स्थापन होणार आहे. यामुळे राज्यात उच्च कौशल्याधारित रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि संरक्षण उद्योगातील स्थानिक परिसंस्थेला चालना मिळेल. तसेच भारतीय लष्कर आणि फ्रेंच लँड फोर्सेसमध्ये अधिकाऱ्यांच्या परस्पर नियुक्तीचा करार दोन्ही देशांच्या सैन्यांतील व्यावसायिक समन्वय अधिक दृढ करेल. संरक्षणाबरोबरच तंत्रज्ञान, आरोग्य आणि नवोपक्रम या क्षेत्रांतील सहकार्य हे या भागीदारीचे दुसरे महत्त्वाचे अंग आहे. 'इंडियाफ्रान्स इयर ऑफ इनोव्हेशन २०२६'ची घोषणा, इंडियाफ्रान्स इनोव्हेशन नेटवर्कची स्थापना, जॉइंट ॲडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट ग्रुपची निर्मिती, या सगळ्या उपक्रमांतून भविष्यातील तंत्रज्ञानात दोन्ही देश एकत्र वाटचाल करणार असल्याचे स्पष्ट होते. अत्यावश्यक खनिजे आणि धातूंवरील संयुक्त उद्देशपत्र आजच्या काळात विशेष महत्त्वाचे आहे, कारण ऊर्जा संक्रमण आणि उच्च तंत्रज्ञानासाठी या खनिजांवर नियंत्रण मिळवणे ही जागतिक स्पर्धा बनली आहे. आरोग्य क्षेत्रातील सहकार्यही तितकेच आशादायी आहे. यामुळे केवळ भारतफ्रान्सच नव्हे तर जागतिक आरोग्य व्यवस्थेलाही लाभ होऊ शकतो. व्यापार आणि गुंतवणुकीच्या दृष्टीने दुहेरी कर टाळण्यासाठीच्या करारातील सुधारणा हा महत्त्वाचा टप्पा आहे. यामुळे उद्योगांना सुलभता मिळेल, गुंतवणूक वाढेल आणि शैक्षणिक तसेच व्यावसायिक देवाणघेवाण अधिक सशक्त होईल. 'होरायझन २०४७' या महत्त्वाकांक्षी रोडमॅपमुळे भारताच्या स्वातंत्र्याच्या शताब्दीकडे वाटचाल करताना फ्रान्स हा विश्वासार्ह भागीदार म्हणून सोबत राहील, हे अधोरेखित होते. भारतफ्रान्समधील हे २१ करार केवळ कागदोपत्री मर्यादित न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीत उतरले, तर ते जागतिक राजकारणात स्थैर्य निर्माण करणारी शक्ती ठरू शकतात. महासागरांच्या तळापासून ते सर्वोच्च शिखरांपर्यंत पोहोचण्याची क्षमता असलेली ही भागीदारी भारताच्या वाढत्या जागतिक भूमिकेचे द्योतक आहे. अस्थिर जगात स्थैर्याची किल्ली सहकार्याच्या हातात असते आणि भारतफ्रान्स करारांनी ती किल्ली अधिक घट्ट पकडली आहे.

# तणावमुक्तीचा मार्ग आनंद शतगुणीत करणारा

अखिल भारतीय साहित्य परिषदेची शाखा आम्ही मेहकरमध्ये स्थापन केल्यावर भारतीय सौर वर्षानुसार स्वामी विवेकानंदांची जंयती दि.०२/०२/ २४ ला मेहकरच्या मे ए सो महाविद्यालयात साजरी केली.यानिमित्ताने 'आईबाबा स्मृती व्याख्यानमालेचा शुभारंभ झाला.विविध विचारपीठावरुन या व्याख्यान मालेतील व्याख्यानाचेआयोजन व्हावे हाआमचा हेतू आहे.पहिले व्याख्यान ' ताणतणाव मुक्तीसाठी स्वामी विवेकानंदाचा संदेश ' या विषयावर होते.जालना येथील प्रा.बी.वाय.कुलकर्णी सरांनी तणावमुक्त कसे जगावे?हे सौदाहरणअत्यंत सुरेख,विनोदी शैलीने, हास्यरसपरिपूर्ण वातावरणात आणि आनंदसागरात विहार करण्याचीअनुभूतीच युवामनाला प्रदान केली. विनोदामधून एका आनंदपर्वणीचे ते प्रात्यक्षिकच होते.

प्रत्येक गोष्ट आपल्याला तर्कानी सिद्ध करणे शक्य नसते.बेरजेपेक्षा गुणाकार नेहमीच जास्त येतो. हा तर्क जर खरा आहे तर १+१=०२आणि ११=१ असे का होते ? आपण पुढचा विचार करतो आणि सुरुवात विसरतो.स्थूलाचा विचार करतांना आपण सूक्ष्म विसरुन जातो.काही वेळेस आपण अकारण मनस्ताप वाढवून घेतो.आणि तणावग्रस्त होतो.एक माणूस न्हाव्याच्या दुकानात दाढी करण्यास गेला. न्हावी त्याची दाढी करू लागला.याने प्रश्न विचारला, तुम्ही कधी गाढवाची दाढी केली आहे का?न्हावी म्हणतो,नाही,आज आणि आत्ता तो योग आला आहे.तेंव्हा या व्यक्तीला खजिल तर व्हावे लागलेच, पण काही कालावधीपर्यंत अकारण मनस्तापही त्याला सहन करावा लागला.आपण आपली जीभ ताब्यात ठेवत नाही त्यामुळे तो प्रसंग आपल्यासाठी मनस्तापाचा आणि इतरांसाठी विनोदाचा होतो.

तसेच चिरंजीव या शब्दाचा अर्थही जो जीव नेहमीसाठी अमर आहै असा होतो.तरी, त्यांचे चिरंजीव आत्ताच वारले. असा शब्दप्रयोग आपणास नेहमीच ऐकायला मिळतो.शब्दाचे अर्थ निट समजून न घेता वापरल्याने आपल्या अगाध भाषा अज्ञानाचे प्रदर्शन तर आपण करतोच आणि विनोदाचा विषय होतो.मग लोक आपल्याला का हसतात?यांना दात काढण्याशिवाय दुसरे काही उद्योग नाहीत.असा शेरा मारुन आपण आपल्यासाठी सुरक्षा कवच निर्माण करतो, पण आपल्यातला कमकुवतपणा मात्र शोधत नाही.तो शोधण्यासाठी आत्मपरिक्षण करावे लागते. स्वार्थी माणसं त्यासाठी कधीच तयार नसतात आणि अतिसामान्य बौद्धीक कुवत असणारी माणसं ते करु शकत नाहीतं.हे मनुष्य वर्तनातील खूप मोठे दुर्दैवच. त्याचा परिणाम समाज व राष्ट्रजीवनावर होतो. हा व्यापक विचार करण्याची दुर्दैवाने कुणालाही गरज वाटत नाही.

या अनुशंगाने बी वाय कुलकर्णी सरांनी आपल्या एका किर्तनकार मित्राचे दिलेले उदा. खूपच अप्रतिम.एकेदिवशी त्या मित्राचा फोन आला.तो म्हणाला,माझ्या किर्तनाला किती लोक येतात,किती हाऊसफुल्ल गर्दी असते,मी बोलतो कसा ? याचा अनुभव घेण्यासाठी एकदा सोलापूरला ये.विशिष्ट तारीख,वार व वेळ त्यांनी सांगीतला.त्याच्या अती आग्रहामुळे मी सुद्धा अती उत्साहाने गेलो. किर्तन संपल्यावर दर्शनसोहळा सुरु झाला.मी सुद्धा रांगेत उभे राहून देवासमान मित्राच्या दर्शनाचाअलभ्य लाभ घेतला.मोठ्या श्रद्धेने व भावभक्तीने त्याच्यासमोरच्या दानपेटीत १००रु टाकलेआणि क्षणभर त्याच्यासमोर थांबलो पण मित्राला माझ्याकडे पहायला वेळ होता कुठे?तो मोठ्या कामात गुंतला होता.मी सरळ पुढे निघून गेलो.त्याच्याजवळ आम्हा दोघांना ओळखत असलेली माणसं होती. त्यांनी त्याला सांगीतले, अहो ते बी वाय कुलकर्णी तुमच्या जवळून गेले. महाराजांचा इगो थोडा जागा झाला,मला न भेटताच कसा काय निघून गेला? मग मला परत बोलवून नेले.परत एकदा या महान विभूतीला मी साष्टांग दंडवत घातला आणि म्हणालो. महाराज मी आपल्याला नमस्कार केला होता.अतिशय कार्यमग्न असलेले महाराज म्हणाले, हो मी जरा कलेक्शन मध्ये होतो. मी आश्चर्याने म्हणालो, म्हणजे ! तो म्हणाला, पैसे मोजत होतो,बरं सांग किर्तन कसं झालं. मी म्हणालो, एकदम बेस्ट ,पण हे तू सांगू नको असं मी म्हणताच तो एकदम दचकला आणि म्हणाला, का?मी म्हणालो,हे मी सर्वासमोर सांगू का तुला एकट्याला सांगू? तो म्हणाला फक्त मलाच सांग. त्याच्याजवळ बसलेल्या सर्वांची तिथून तात्काळ सुटी करण्यात आली.मला जवळ बसवून तो अत्यंत नम्र स्वरात म्हणाला, मला ऐकू येईलं एवढ्याच हळू आवाजात बोलं मी त्याच्या त्या आज्ञेचं पालन करुन अगदी शांततेनं व हळू आवाजात बोलू लागलो, किर्तन अगदी बेस्ट झालं.तुझी भाषा,तुझा आवाज,स्वरातील आरोह, अवरोह,अप्रतिमच.उदा.दाखले देवून ईश्वरभक्ती तू श्रौत्यांच्या अगदी गळी उतरवलीस,त्यामुळे तू धन्य आहैसक्षणभर त्याच्या चेहऱ्यावर स्मितहास्य झळकले व आनंदी छटा पसरल्या.नंतर मी म्हणालो, पण हे तू सांगू नये.

या माझ्या एका वाक्याने त्याचा चेहरा खर्रकन उतरला. तात्काळ त्याच्या चेहऱ्यावर अमवस्याची मध्यरात्र जाणवू लागली.मीही क्षणभर थांबलो.तो म्हणाला,बोलं मी पुढे बोलू लागलो,तू सांगीतलं, शरीरं नश्वर आहे,नाशिवंतआहे,हे सर्व मर्त्य आहे, त्यासाठी देहाचे लाड नको,धनसंचय तर मुळीच नको.तो म्हणाला,हो यातं माझं काय चुकलं ? मी त्याची उक्ती आणि कृतिविषयी बोलू लागलो.मग तुझ्यासाठी आयोजकाकडून केशरदूध,बादामपिस्त्याचा शिरा,सर्व श्रोत्यासाठी काळा चहा, तुझ्यासाठी पुरणपोळी त्यावर गावरान तूपाची धार आणि आमच्यासाठी बटाट्याची भाजी,त्या भाजीला चवं शोधून सापडत नव्हती.तुझ्यासाठी उच्चासन,त्यावर फोमची गादी बाजूला कुलर,सर्व मंडपासाठी फक्त दोन पंखे,बसण्यासाठी सतरंजीअगदी टोकदार खडे टोचत होते रे सर्व भक्तांना.मी सुद्धा तो अनुभव घेतला रे.मग देहाचे लाड कोण करतं होते? या सर्व प्रकारावरुन प्रबोधनाची गरज कोणाला आहे? तो खूपच खजिलं झाला.

पुढे मी म्हणालो,मंदिरं दगडामातीची आहेतं. शरीर हे एकमात्र ईश्वरनिर्मित मंदिर आहे.त्यामुळेच देह देवाचे मंदिर असे म्हणतात.ते स्वच्छ,निर्मळ, सुंदर,छान व पवित्र असले पाहिजे.मंदिर स्वच्छ करुन आल्यावर येतांना जो माणूस व्यसनाधिन व वासनांध होत असेलं,तर त्या मंदिर सफाईला अर्थ काय?हे सर्व ऐकुण तो क्षणभर स्तब्ध झाला.पुढे मी बदललो असे कळवत होता.तो बदलला असेलं यावर विश्वास ठेवण्याशिवाय मी तरी काय करु शकतो?

मित्रहो गणित,आपण बुद्धीने सोडवितो. विज्ञान प्रयोगशाळेत सिद्ध करतो.कवितांचे श्रवण भावनांनी करतो आणि भजन,किर्तनात समर्पणाने तल्लिन होतो. नसता कानानी पहाणे व डोळ्यांनी ऐकण्याचा विसंगत प्रयोग होईल आणि त्याचा निष्कर्ष काय निघेलं ? हे सांगण्यासाठी कोणत्याही तत्ववेत्याची आवश्यक्ता नाही.मानवी उत्क्रांतीचा अभ्यास करत असतांना कपडे घालण्यास सुरुवात का झाली?नागडे शरीरं हे वासनांना जन्म देते. त्यासाठीच ते झाकल्या गेले पाहिजे. पुढे शरीराची गरज पूर्ण करण्यासाठी विवाहसंस्थाचा जन्म झाला.विवाह संस्थांना वळण लावण्यासाठी कुटुंबसंस्था निर्माण झाल्या.त्यांना नियंत्रणात ठेवण्यासाठी कुटुंबप्रमुख महत्वाचा वाटला.यातून निर्माण झालेल्या समाज व्यवस्थेला न्याय देण्यासाठी राजेशाहीआली. त्या मधील बेबंदशाहीला प्रत्युत्तर देण्यास लोकशाहीची निर्मिती झाली.पण मतदार पैसे घेवून मतदान करतात.हे वास्तव समोर आल्यावर उत्क्रांती इथे स्थितिशीलं झाली आहे.तीला गतीशील करण्यासाठी वाटचाल सुरु करण्याची गरज आहे.

आपल्या वर्तनातीलं दोष शोधून आपल्यात सकारात्मक बदल करु शकणारा आत्मपरिक्षण करण्यास सक्षम असतो.माझा शर्ट फाटका आहे किंवा तोंडाला काळे लागले आहे किंवा माझे केस विस्कटलेले आहेत.त्यावेळी आरशासमोर उभे राहिल्यास तो आपले व्यंग,उणिवा,दोष दाखवून देतो.तेंव्हा आरसा फोडायला निघालेली माणसं आपल्या आईवडिलांचे महत्व कसे जाणणार?आरसा फोडण्याची प्रवृती कृतघ्न आहे.एवढेच नव्हे तर ती विचित्र व विक्षिप्त प्रवृतीकडे वाटचाल करते.युवा- पिढीला आरसा दाखवण्याचे काम आईबाबा स्मृती व्याख्यानमाला करेलं,आरसा फोडणाऱ्या प्रवृती कदाचित तीला बंद पाडण्याचे काम करतीलं त्या साठी जागरुक राहुन हे काम अविरतपणे सुरु ठेवले पाहिजे.सत्य जाणून उपाययोजना शोधल्या गेल्या पाहिजेत. हे सिद्ध करण्यासाठी एक अत्यंत विनोदी उदा.देऊन सरांनीनी आपल्या व्याख्यानाचा समारोप केला.

एकदा एक माणूस डॉक्टरकडे गेला आणि म्हणाला, माझ्या बायकोला ऐकू येत नाही हो! डॉक्टर म्हणाले,तुम्ही त्यांना घेवून काआला नाही? तो म्हणाला,ती इथे यायला तयार नाही.या वयात मी तिला उचलून आणू शकत नाही,पण तुम्ही औषध द्या,ते तिला कसे द्यायचे ते मी पहातो.डॉक्टर म्हणाले,मी सांगतो त्याप्रमाणे टेस्ट करा.हा घरी गेला. विस मिटरवरुन हाक मारली,त्यानंतर पंधरा मिटरवरुन,नंतर दहा मिटरवरुन व पाच मिटरवरुन याला बायकोची ओ.... ऐकू आली नाही.शेवटी हा जवळ जाऊन जोरात ओरडला. बायको तेवढ्याच जोरात ओरडून म्हणाली,अहो तुमच्या हाकेला ओ देण्याची ही पाचवी वेळ आहे. समस्येचे निराकरण बिनचूक होणे गरजेचे आहे. नसता आग सोमेश्वरी आणि बंब रामेश्वरी होण्याच्या अनेक घटना पहायला ऐकायला व अनुभवायला मिळतात.ते होता कामा नव्हे.

हा सुंदर तणावमुक्तीचा अनुभव आमच्या कायम स्मरणात राहीलं.युवापिढीसमोर निवृत्त झाल्यावर त्यांच्या समस्येचे निराकरण घेवून गेल्याने जेष्ठांचा आनंद शतगुणीत होतो.हा स्वानुभव आमचे मानवी जीवन समृद्ध व संपन्न करणारा होता.तो आम्ही वारंवार घेणार आहोत.

**-प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२
८४८२८९०९९१

# व्हॉट्सअपचा वाढदिवस

जगातील सर्वाधिक लोकप्रिय आणि सर्वाधिक वापरले जाणारे मेसेजिंग अप्लिकेशन व्हाट्सअपचा

आज वाढदिवस आहे. २४ फेब्रुवारी २००९ रोजी जेन कॉम याने व्हाट्सअप ळपल नावाची कंपनी स्थापन केली. व्हाटसअपचा निर्माता जेन कॉम याचा जन्म युक्रेन देशातील छोट्या गावात झाला. त्याचे वडील मजूर तर आई गृहिणी होती. युक्रेनमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झाल्यावर त्याचे वडील अमेरिकेत स्थलांतरित झाले. तिथे ते छोटीमोठी कामे करू लागले. जेन कॉम याला कॉम्प्युटर प्रोग्रामिंगची आवड होती. त्याच्या घराजवळच एक लायब्ररी होती. तेथून तो कॉम्प्युटर प्रोग्रामिंगचे पुस्तके आणत व घरच्या कॉम्प्युटरवर प्रोग्रामिंग करीत.

पुढे त्याने कॉम्प्युटर सायन्समध्ये डिग्री मिळवून एका सॉफ्टवेअर कंपनीत सिक्युरिटी टेस्टर म्हणून काम सुरू केले. १९९७ साली याहू कंपनीने इन्फ्रास्ट्रक्चर इंजिनिअर यापदावर त्याची नेमणूक केली. या कंपनीत त्याने ९ वर्ष नोकरी केली. दुसऱ्या कंपनीत नोकरी करण्यापेक्षा स्वतःची कंपनी सुरू करावी या विचाराने त्याने याहूला राजीनामा दिला. याहूमध्ये ब्रायन अकटन हा त्याचा सहकारी होता. त्यानेही याहूला राजीनामा दिला. दोघांनी मिळून स्वतःची कंपनी स्थापन करण्याचे ठरवले. त्या सुमारास ॲप्पल कंपनीने आयफोन बाजारात आणला होता. त्यात मेसेज पाठवण्याची सुविधा होती. त्यावरून त्यांना व्हाटसअपची कल्पना सुचली.

पुढे दोघांनी त्यावर काम करण्यास सुरवात केली त्यात त्यांना यश मिळाल्याने २४ फेब्रुवारी २००९ रोजी त्यांनी व्हाटसअप ळपल नावाची कंपनी स्थापन केली. सुरवातीला व्हाट्सअप ला खूपच कमी प्रतिसाद मिळाला कारण तेंव्हा अँड्रॉइड मोबाईलची संख्या खूप कमी होती पण जशी अँड्रॉइड मोबाईलची संख्या वाढत गेली तशी व्हाटसअप वापरणाऱ्यांची संख्याही वाढत गेली. आज व्हाटसअप जगातील पहिल्या क्रमांकाचे अप्लिकेशन बनले आहे. जगातील किमान शंभर कोटीहून अधिक लोक व्हाटसअपचा वापर करतात. प्रत्येकाच्या मोबाईलमध्ये व्हाटसअप असतेच. व्हाटसअपवर रोज ४३००० कोटी मेसेज सेंड होतात. व्हाटसअप वरुन दररोज १६० कोटी फोटो तसेच २५ कोटी व्हिडीओ शेअर होतात. सुरवातीला फक्त इंग्रजीमध्ये असणारे व्हाटसअप आज ५३ भाषांमध्ये आहे. व्हाटसअप नेहमीच नवनवीन सुविधा वापरकर्त्यांसाठी उपलब्ध करुन देते. आज व्हाटसअप वरून पैसेही पाठवता येऊ शकतात. २०१४ साली फेसबूकच्या मार्क झुकेरबर्ग याने १९ बिलियन डॉलरला जेन कॉम आणि ब्रायन अकटन यांच्याकडून व्हाटसअप खरेदी केले. आज व्हाटसअपची मालकी मार्क झुकेरबर्ग यांच्याकडे आहे. आज व्हाटसअप प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनला आहे. व्हाटसअपला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो.९९२२५४६२९५

# मुद्रण कलेचे आद्य प्रणेते : जोहान्स गटेनबर्ग

मानवाच्या जीवनात अनेक क्रांतिकारी शोध लागले. या शोधामध्येच मुद्रण कलेचा शोध हाही महत्त्वाचा आहे.जोहान्स गटेनबर्गने १४५० मध्ये जागतिक मुद्रण कलेचा शोध लावला. त्यामुळे वैज्ञानिक, शैक्षणिक,सामाजिक क्रांतीची सुरुवात झाली. आणि छपाई यंत्र सुरू झाले. त्यानुसार लोकांपर्यंत पुस्तके पोहोचली. छपाईच्या शोधामुळे सर्वत्र ज्ञानाचा प्रसार झपाट्याने झाला तसेच भाषेचे ज्ञान वाढले. आधुनिक तंत्रज्ञान समजू लागले. जगाला छपाईच्या शोधाने बौद्धिक परिवर्तन घडविले. त्यामुळे माहिती व प्रसारणाचे ज्ञान वाढले. जोहान्स गटेनबर्ग यांचा जन्म जर्मनीतील मेंझ या शहरात झाला.



ते बालपणा पासूनच अतिशय चलाख बुद्धिमत्तेचे होते.त्यांनी शिक्षण घेत असतानाच मुद्रण कलेचा शोध लावण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न करू लागले.त्यामुळे मुद्रण कलेची ओळख संपूर्ण जगाला झाली. त्यांच्या या शोधामुळे सर्वत्र आज वेगाने छपाई केली जात आहे.याचे सर्व श्रेय जोहान्स गटेनबर्ग यांनाच द्यावे लागते. त्यांचे वडील एक प्रतिष्ठित व्यावसायिक होते.

त्यांचा कापड विकण्याचा व्यवसाय होता. जोहान्स गटेनबर्ग हे सुवर्णकार, व्यावसायिक व प्रकाशक होते.त्यांनी सुरुवातीस ४२ आळीचे बायबल मुद्रांकित केले. ते लॅटिन भाषेत छापले गेले. आणि १४५७ मध्ये त्यांचे प्रकाशन झाले. येल विद्यापीठात गटेनबर्ग यांनी छापलेले पुस्तक ग्रंथालयात जतन करून ठेवले आहे. सुरुवातीला धातूचा वापर करून स्वतंत्र अक्षराचा उपयोग केला. पितळ या मिश्रणातून उलटी अक्षरे कोरली. त्यात वितळलेले शिसे आतले. त्यानंतर एका अक्षराच्या अनेक प्रती मिळू लागल्या.चलअक्षरामुळे पाने एकमेकांना जुळविणे शक्य झाले. सुरुवातीला तेलाचा उपयोग करून मुद्रणासाठी शाई बनविली. त्यामुळे मुद्रणांत सुधारणा झाली. कागदावर साचा टाकून दाबला जाई. त्यामुळे शाईतून अक्षरे ठळक उमटत असत. वाचन करण्यासाठी अतिशय सोपे होते. त्यामुळे मुद्रण कलेचे आद्य प्रणेते म्हणून गटेनबर्ग यांना म्हटले जाते. २४ फेब्रुवारी हा त्यांचा जन्म दिन जागतिक मुद्रण दिन म्हणून सर्वत्र अतिशय उत्साहाच्या वातावरणात साजरा केला जातो.

या शोधामुळे उच्चवर्णीयांची मक्तेदारी संपली. आणि सर्वसामान्य लोकांना ज्ञान ,विचार व माहितीचा खजिना मिळाला. त्यामुळे सर्वसामान्य लोकांना विकास करण्याच्या मार्ग मोकळा झाला.आणि समाजाला नवीन एक वैज्ञानिक गती मिळाली. १४५५ मध्ये त्यांनी 'बायबल' हे धार्मिक पुस्तक छापले. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे सर्वत्र छपाई सुरू झाली. सुरुवातीला १८० प्रती बायबलच्या छापल्या गेल्या. अमेरिका,लंडन,येल व हार्वर्ड विद्यापीठात या प्रती जतन करून आजही ठेवलेल्या आहेत. या ग्रंथ छपाईनंतर विज्ञान,साहित्य आणि सामाजिक विचारसरणीचा प्रसार जलद होत गेला. पुस्तके आज मोठ्या प्रमाणात छापली जात आहेत. त्यामुळे किंमत कमी झाली आणि युरोपात ज्ञानाची क्रांती झाली. आधुनिक जगाचा पाया छपाई मुळे घातला गेला.जोहान गुटणबर्ग यांच्या शोधामुळे सर्वत्र परिवर्तन झाले. प्रकाशकांना नवनवीन पुस्तके छापून धर्म,राजकारण,विज्ञान या क्षेत्रात बदल घडवून आणले. त्यामुळेच साहित्यिक,लेखक,कवी,प्रकाशक तयार झाले. वाचकांची संख्या वाढली. आणि शिक्षणाचे सार्वत्रिकरण झाले. या सर्व गोष्टीचे मुख्य प्रवर्तक म्हणजे जोहान्स गटेनबर्ग हेच आहेत.त्यांना विसरून आपणास चालणार नाही. जोहान्स गटेनबर्गच्या अगोदर चीनमध्ये कागदाचा शोध लागला होता. मुद्रण कलेचा शोध लागल्या मुळे जगात आज कोणत्याही माहितीचे आदान- प्रदान सहज केले जाते. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मजकूर पाठवता येतो. अगोदर कृष्णधवल चित्रे काढली जात होती नंतर त्यात बदल होत गेला .कलर पुरवण्या छापल्या जाऊ लागल्या. वृत्तपत्रांमध्ये तर अनेक सुधारणा झाल्या. आज ईमेल वरून ठळक अक्षरात संपूर्ण मेसेज व्यवस्थित वाचन करता येतो. संगणकामुळे बऱ्याच गोष्टी आज शक्य झाल्या. त्यामुळे जागतिक मुद्रण दिन खरोखरच संपूर्ण मानव जातीला उपयुक्त ठरला आहे. वेगवेगळ्या संस्थांचे कागदपत्रे पुस्तके सर्व छापून आज जलद मिळतात. छपाई च्या शोधामुळे साक्षरतेत वाढ झाली त्यामुळे वाचनाची आवड तरुणात निर्माण झाली छपाईमुळे भाषा विषयाची व्याकरण शुद्धलेखन शब्दलेखन सुधारले जाहिराती व्यावसायिक कागदपत्रे वेगवेगळ्या देशाचे नकाशे छापल्यामुळे भौगोलिक क्षेत्राचे ज्ञान वाढले आणि तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. लाखो ग्रंथालयाचा विकास होऊन लोक वाचन संस्कृतीत रममाण झाले. जागतिक मुद्रण दिनाच्या निमित्ताने प्रत्येक प्रकाशकांनी दर्जेदार पुस्तके छापावेत आणि समाजाला वाचन करण्यासाठी माफक किंमतीत उपलब्ध करून द्यावेत. आज आपल्यात जोहान्स गटेनबर्ग नसले तरी ते त्यांच्या कार्याने अजरामर झालेले आहेत. आजचे डिजिटल युग जे तयार झाले आहे. त्याचे मुख्य सूत्रधार जोहान्स गटेनबर्ग हेच आहेत. हे आजच्या समाजांनी विसरू नये.

**-विठ्ठल बरसमवाड**
अध्यक्ष
विठू माऊली प्रतिष्ठान खैरकावाडी
ता. मुखेड, जि.नांदेड

# नागापूर, सिद्धनाथ, पुणेगाव वाळूघाटावरून अडीच कोटींचा मुद्देमाल जप्त, १२ जणांविरुद्ध गुन्हे दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील नागापूर, सिद्धनाथ, पुणेगाव वाळूघाटावरून अडीच कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या प्रकरणी १२ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

नांदेड ग्रामीण पोलिसांनी वरिष्ठांच्या आदेशावरून रविवार, दि. २२ फेब्रुवारी रोजी नागापूर, सिद्धनाथ आणि पुणेगाव शिवारात अवैध वाळू उपसा करणाऱ्या ठेक्यावर कारवाई केली. यावेळी चार जणांना अटक करून सात जण मात्र पसार झाले. पोलिसांनी यावेळी ५ मोठ्या लोखंडी बोटी, ५ मध्यम बोटी, अनेक इंजिन, ८५ ब्रास वाळू, ५० हून अधिक तराफे असा २ कोटी ६३ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तराफे जाळून जागेवरच नष्ट करण्यात आले.

जिल्ह्यात गोदावरी, आसना, सिता, मन्याड आणि पैनगंगा अशा नद्यांना मोठ्या प्रमाणात वाळू माफियांकडून हानी पोहोचण्यात येत आहे. त्यामुळे पर्यावरण आणि नदीचे पावित्र्य नष्ट करण्यात वाळूमाफिया सक्रिय झाल्याने त्यांच्याविरुद्ध कडक कारवाई करण्याचे आदेश पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप आणि पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी आपल्या अधीनस्त असलेल्या यंत्रणांना दिले.

यावरुन नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २२ फेब्रुवारी रोजी पोलीस उपनिरीक्षक व्यंकट कुसमे आणि सुनील भिसे यांच्या पथकाने पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना दुपारी दोनच्या सुमारास माहिती मिळाली की वांगी, इंजेगाव, नागापूर, सिध्दनाथ, पुणेगाव परिसरातील गोदावरी नदीपात्रात बोटी, इंजीन व तराफ्यांच्या साह्याने अवैध वाळू उपसा करून साठवणूक होत आहे. या माहितीवरुन वरील अधिकारी व अंमलदार वांगी, इंजेगाव, नागापूर, सिध्दनाथ, पुणेगाव, हद्दीतील गोदावरी नदीपात्रात दुपारी पोहचले. सलग १० तास पाच ठिकाणी छापा करवाई केली असता नदी पात्रातून बोटी, तराफे व इंजीनच्या साहायाने वाळू काढणारे अनोळखी सात आरोपी पोलिसांना पाहून पळून गेले. सदर कारवाईमध्ये करण सोनटक्के, शहाजी सोनटक्के, छगन बुक्तरे सर्व रा. ब्राम्हणवाडा आणि गजानन म्हस्के रा. नागापूर यांचा समावेश होता.

# महानगरपालिकेत संत गाडगेबाबा यांना अभिवादन

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने सोमवार, दि.२३ फेब्रवारी रोजी सकाळी ११ वाजता स्थायी सभागृह कक्षात महापौर कविता संतोष मुळे यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी सुध्दा प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

राष्ट्रसंत गाडगेबाबा हे महाराष्ट्रातील एक थोर समाजसुधारक, कीर्तनकार आणि स्वच्छतेचे अग्रदूत होते. गाडगेबाबा हातात झाडू घेऊन स्वतः गावे स्वच्छ करत असत. स्वच्छता हीच खरी ईश्वरसेवा हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला. त्यांच्या सन्मानार्थ महाराष्ट्र शासनाने संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान सुरू केले. ते आपल्या कीर्तनातून अंधश्रद्धा, अनिष्ट चालीरीती, जातिभेद आणि प्राणीबळी यांच्यावर कडाडून टीका करत असत. सामान्य माणसाला समजेल अशा लोकभाषेत (वऱ्हाडी बोलीत) ते संवाद साधत. शिक्षण हाच माणसाचा खरा दागिना आहे, असे ते मानत.

याप्रसंगी नगसेवक प्रतिनिधी किशोर भवरे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपायुक्त अभिजित वायकोस, उपायुक्त अजितपालसिंग संधु, उपायुक्त नितिन गाढवे, सिस्टीम मॅनेजर सदाशिव पतंगे, सहाय्यक आयुक्त मनिषा नरसाळे यांच्यासह मनपातील इतर कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत निरंकारी मंडळाच्यावतीने काळेश्वर मंदिर येथील गोदावरी घाटांची सफाई

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – मानवी जीवनाकरिता जलसंवर्धनाविषयी समाजात जागृती करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन संत निरंकारी मंडळाच्या वतीने नांदेडच्या प्रमुख लता प्रेमचंदांनी यांनी केले.

संत निरंकारी मंडळाच्या प्रोजेक्ट अमृत अंतर्गत स्वच्छ जल – स्वच्छ मन या कार्यक्रमांतर्गत काळेश्वर मंदिर येथील गोदावरी घाटांची साफ – सफाई अभियानाच्या प्रसंगी झालेल्या सत्संग कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, जेव्हा सेवा हीच साधना ठरते आणि निसर्गाविषयी संवेदनशीलता जीवनाचा मूलमंत्र बनते, तेव्हा समाजाला नवी दिशा देणारे पवित्र संकल्प जन्माला येतात. मानवसेवा व लोककल्याणाच्या या दिव्य भावनेला साकार रूप देत संत निरंकारी मिशनच्या वतीने 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचा शुभारंभ परम श्रद्धेय सतगुरु माता सुदीक्षा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण भारतभर एकाच वेळी साजरा होत आहे. हा उपक्रम देशभरातील १५०० हून अधिक ठिकाणी एकाच वेळी आयोजित केला जाईल. या महामोहिमेचे हे अभूतपूर्व प्रमाण या मोहिमेला ऐतिहासिक स्वरूप देईल, ज्यामुळे जलसंधारण आणि स्वच्छतेचा संदेश अधिक प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचेल, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

पाणी हे केवळ एक साधन नसून जीवनाचा आधार आणि ईश्वराची अमूल्य देणगी आहे. त्याचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे. ही जागृती समाजामध्ये निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. संत निरंकारी मिशनने बाबा हरदेवसिंह यांच्या प्रेरणादायी शिकवणी आत्मसात करून सन २०२३ मध्ये संस्कृती मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्याने 'प्रोजेक्ट अमृत'ची सुरुवात केली होती. जलसंवर्धन हा उपक्रम केवळ एखाद्या दिवसापुरता किंवा मर्यादित मोहिमेपुरता न ठेवता तो एक जीवनशैली, संस्कार आणि सेवाभाव म्हणून स्वीकारण्याची प्रेरणा बनेल जिथे स्वच्छ जलातून स्वच्छ मन आणि स्वच्छ समाज घडू शकेल.

नद्या, तलाव, सरोवरे, विहिरी व झरे अशा नैसर्गिक जलस्रोतांच्या संरक्षणासाठी समर्पित या जनआंदोलनाने आपल्या पहिल्या तीन टप्प्यांत सेवा, समर्पण व सहभागाचे उत्कृष्ट उदाहरण निर्माण केले आहे. याच यशामुळे प्रेरित होऊन हा चौथा टप्पा अधिक व्यापक, संघटित व दूरदृष्टीपूर्ण स्वरूपात राबविला जात आहे, ज्यामुळे समाजातील प्रत्येक घटकात निसर्गाबद्दल जागरूकता व सहभागाची सशक्त भावना निर्माण होईल.

भविष्यात आपले नैसर्गिक जलस्रोत टिकून ठेवण्यासाठी जास्तीत जास्त मानव व निसर्गप्रेमींनी जलसंवर्धन सारखे उपक्रम राबवणे व ही समाजात जागृती आणणे काळाची गरज आहे.

या कार्यक्रमाकरिता जिल्ह्यातून सर्व भागातील भक्तांनी आपला सहभाग नोंदवला. तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी काळेश्वर मंदिर देवस्थानचे सर्व ट्रस्टी उत्तमराव हंबर्डे, बालाजीराव हंबर्डे, जयसिंग हंबर्डे, प्रभूजी हंबर्डे विष्णुपुरीचे सरपंच राजू हंबर्डे यांनी आपले विशेष योगदान देऊन सहकार्य केले.

संत निरंकारी मंडळाच्या लता प्रेमचंदांनी व संचालक इंजि. दिलीप बाळसकर सर्व ट्रस्टीचे आभार व्यक्त करून त्यांचे प्रतिनिधी प्रभाकर हंबर्डे यांचा संत निरंकारी मंडळाचे वाचन साहित्य देऊन सत्कार करण्यात आला.

# बनावट वेबसाईटस, मोबाईल ॲप्स व खोट्या ई-चालान लिंकपासून सतर्क राहण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** वाहनधारक आणि चालकांची आर्थिक फसवणूक वाढल्याच्या पार्श्वभूमीवर परिवहन विभागाने बनावट वेबसाइट्स, संशयास्पद मोबाईल ॲप्स (एपीके) आणि खोट्या ई चालान लिंकपासून सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी, ई-चालान यांसारख्या सेवांच्या नावाखाली अनेक नागरिकांची वैयक्तिक माहिती व आर्थिक व्यवहारांची फसवणूक होत असल्याचे परिवहन विभागाच्या निदर्शनास आले आहे. कोणताही संशयास्पद संदेश किंवा लिंक प्राप्त झाल्यानंतर तात्काळ नॅशनल सायबरक्राईम पोर्टलचे https://www.cybercrime.gov.in, सायबर फसवणूक हेल्पलाइन क्रमांक १९३० किंवा जवळचे जिल्हा सायबर पोलीस स्टेशन या ठिकाणी तक्रार नोंदवावी, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत कंकरेज यांनी केले आहे.

**नांदेड–** आंध्रा समिती परिवार नांदेडतर्फे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी शासकीय आयुर्वेदिक कॉलेजसमोर शिवप्रेमींना आंध्र समिती परिवारातर्फे पुलिहोरा व पाणी वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव संजय तुला यांचे मार्गदर्शन लाभले. सदरील कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष जी. नागय्या, सहसचिव आय. जयराज, शाळेय समिती अध्यक्ष डी. लक्ष्मणाचारी, कोषाध्यक्ष सामलेटि नागभूषनम, शाळेय समिती अध्यक्ष शिवरात्री सत्यानंद, प्रकाश मुदीराज, कोंका रमेश व शाळेचे मुख्याध्यापक पद्माकर जोंधळे, पर्यवेक्षक संदीप बैस यांची उपस्थिती होती. यावेळी शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी पुलिहोरा व पाणी वाटपकामी सहकार्य केले.

# बाऱ्हाळी येथे जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन

**बाऱ्हाळी (प्रतिनिधी)** – जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी संस्थान नानिजच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमा अंतर्गत जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या बाऱ्हाळी येथे मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २६ रोजी पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी संस्थान नानिजधामच्या वतीने देशासह राज्यात विविध सामाजिक, आरोग्य विषयक, मोफत ईंग्रजी माध्यमातून शिक्षण, मोफत वेद पाठशाळा, रक्तदान, मरणोत्तर देहदान, अवयवदान, पर्यावरण, धार्मिक, अंधश्रद्धा निर्मूलन यासारखे विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. अंधश्रद्धा निर्मूलन या उपक्रमांतर्गत बाऱ्हाळी ता. मुखेड जि. नांदेड (द.) येथे मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी रोजी जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या सिद्धपादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून त्या अनुषंगाने उदगीर रोड, भवानी पेट्रोल पंपाच्या पाठीमागे उमाटे पाटील यांच्या शेतात सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सकाळी ८ वा. शहरातून भव्य मिरवणुकीने पादुका संतपीठावर स्थापना, गूरूपूजन, उपासक दीक्षा, आरती सोहळा, पुष्पवृष्टी, प्रवचनकाराचे अमृततुल्य प्रवचन, दर्शन, सामाजिक उपक्रम आदी भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास नांदेड जिल्ह्यासह लातूर जिल्ह्यातील उदगीर, जळकोट तालुक्यातून २५ ते ३० हजार भाविक उपस्थित राहणार असल्याची माहिती तेलंगणापीठ प्रमुख तथा जिल्हा निरीक्षक काकासाहेब वनारसे यांनी दिली आहे. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विविध समिती गठीत करण्यात आल्या आहेत. सर्वांना महाप्रसाद, पार्किंग व्यवस्था, पिण्याचे शुद्ध पाणी, भव्य मंडप उभारणी करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील भक्तांनी जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या बाऱ्हाळी येथील पादुका दर्शन सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा सेवा समिती नांदेड (दक्षिण), तालुका सेवा समिती मुखेड व उत्सव समिती, कार्य समिती बाऱ्हाळीच्या वतीने करण्यात आले आहे.

# कुंडलवाडीत मोटारसायकल चोरीचा गुन्हा ४८ तासांत उघड; तीन आरोपी मुद्देमालासह अटकेत

**कुंडलवाडी (वार्ताहर)** – येथील पिंपळगाव (कु) परिसरात घडलेल्या मोटारसायकल चोरीच्या प्रकरणाचा छडा पोलिसांनी अवघ्या ४८ तासांत लावला आहे. या प्रकरणी तीन आरोपींना मुद्देमालासह अटक करण्यात आली आहे. अटक आरोपींना बिलोली येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी डी. आय. घोरपडे यांच्या न्यायालयात हजर केले असता त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

पिंपळगाव (कु) येथील रहिवासी नागनाथ विठ्ठल भंडारे यांची एम. एच. २६ ए. वाय. ७२३४ क्रमांकाची मोटारसायकल दि. १६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी पिंपळगाव शिवारातील शेतातून अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली होती. याबाबत कुंडलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत दि. १९ फेब्रुवारी रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पिंपळगाव (कु) शिवारातून आरोपी बुद्धरतन धम्मानंद रामटके (रा. हिंगोली ह. मु. पिंपळगाव कु १९), लक्ष्मण माणिक जाधव (रा. पिंपळगाव कु २१) व वैभव प्रल्हाद होनपारखे (रा. पिंपळगाव कु. १६) यांना ताब्यात घेऊन चौकशी केली. चौकशीत त्यांनी मोटारसायकल चोरीची कबुली दिली असून, चोरीस गेलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. आरोपींनी कुंडलवाडी शहर व परिसरात आणखी मोटारसायकल चोरी केल्या आहेत का, याबाबत पोलीस अधिक तपास करत आहेत.

# एनएसबी होली लोटस स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**नांदेड (प्रतिनिधी)** – अभिनव भारत शिक्षण संस्था संचलित नवा मोंढा सिडको येथील एनएसबी होली लोटस स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. या स्नेहसंमेलनात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी देशभक्ती, सामाजिक प्रबोधन, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय एकता यावर आधारित एकापेक्षा एक सरस नृत्य आणि गीते सादर करत प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभिनव भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब पांडे तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी उपप्राचार्य डॉ. दीपक कासराळीकर, शाळेच्या प्राचार्या सौ. अनिता बावणे आदींची उपस्थिती होती. वार्षिक महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी सौ. राजन्मी राठोड, सौ. सुमती पिनोजी, सौ. अपर्णा वाडेवाले, सौ. श्वेता वेगालम आदी शिक्षक आणि नृत्य दिग्दर्शक सोनू जोगदंड आदींनी परिश्रम घेतले.

LOTUS SCHOOL
ANNUAL FUNCTION
CIDCO NANDED

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदिश्री पांडे व अजितेश पांडे यानी केले. या वार्षिक स्नेहसंमेलनास विद्यार्थी, पालक आणि प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अनुसूचित जातीतील युवक-युवतींसाठी विदेशातील नोकरी व करिअर संधी उपलब्ध

**नांदेड (प्रतिनिधी)–** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या वतीने अनुसूचित जातीतील युवक-युवतींसाठी विदेशातील नोकरी व करिअर संधी उपलब्ध करून देण्यासाठी बार्टी करिअर अँड एम्प्लॉयमेंट फेअरचे आयोजन करण्यात आले आहे.

हा फेअर दि. २८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत नांदेड येथील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह येथे आयोजित करण्यात आला आहे. सदर फेअर महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील १८ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींसाठी असून, प्रवेश व मार्गदर्शन पूर्णपणे विनामूल्य आहे. प्रथम येणाऱ्यास प्राधान्य देण्यात येणार आहे. उद्घाटन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमात अरब अमिराती, सौदी अरेबिया, कतार, बहरीन, कुवेत व ओमान या देशांमधील रोजगार संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. दुबई येथील काही प्रतिष्ठित मान्यवर व अधिकारी तसेच बार्टीचे महासंचालक सुनील वारे, निबंधक विशाल लोंढे व इतर अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या कार्यशाळेमध्ये ग्लोबल जॉब मार्केटमधील संधी, योग्य देशाची निवड, आवश्यक पात्रता व कौशल्ये, भाषा प्रशिक्षण, अर्ज प्रक्रिया, प्रभावी रेज्युमे तयार करणे, मुलाखत तयारी, व्हिसा प्रक्रिया, प्लेसमेंट एजन्सी, कायदेशीर बाबी, पगार संरचना, खर्च व आर्थिक नियोजन तसेच दीर्घकालीन करिअर नियोजन याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे. हे मार्गदर्शन बार्टीच्या पॅनलवरील एजन्सी प्रेरणा कन्सल्टन्सी, मुंबई यांच्या माध्यमातून केले जाणार आहे.

उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांनी शैक्षणिक प्रमाणपत्रे व गुणपत्रिकांच्या झेरॉक्स प्रती, जात प्रमाणपत्र, आधार कार्ड तसेच दोन पासपोर्ट साईज फोटो सोबत आणणे आवश्यक आहे. परदेशात नोकरी व करिअर घडविण्याची संधी शोधणाऱ्या पात्र युवक-युवतींनी या सुवर्णसंधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन बार्टीच्या ओव्हरसीज प्रोग्रामचे प्रमुख डॉ. बबन जोगदंड, प्रज्ञा मोहिते व महेश गवई यांनी केले आहे.

# अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या तालुका अध्यक्षपदी मनोज कीर्तने

**श्रीक्षेत्र माहूर (प्रतिनिधी)–** अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य अध्यक्ष माधव बावगे यांच्या प्रमुख उपस्थितीत माहूरच्या विश्रामगृहात झालेल्या बैठकीत माहूर तालुका कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यावेळी माहूर तालुका अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अध्यक्षपदी मनोज कीर्तने यांची निवड करण्यात आली.

उर्वरित कार्यकारिणी अशी– उपाध्यक्षपदी डॉ. बाबाराव डाखोरे व राज ठाकूर, कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर कराळे पाटील, सल्लागार म्हणून डॉ. प्रकाश जैन यांची निवड करण्यात आली. प्रधान सचिव जयकुमार अडकिने व सुभाष खडसे बुवाबाजी विरोधी संघर्ष विभागाच्या अध्यक्षपदी पत्रकार इलियास बावाणी यांची निवड करण्यात आली. विविध उपक्रम विभाग साजिद खान वैज्ञानिक जाणीव व शिक्षण प्रकल्प विभाग राजेंद्र चारोडे, महिला सहभाग विभाग सौ. सुरेखा तळणकर, युवा सहभाग विभाग आकाश कांबळे यांची निवड करण्यात आली. तसेच निवड विभाग ॲड. गजानन चांदेकर, जात पंचायत मूठमाठी अभियान विभाग प्रा. विनोद कांबळे, आंतरजातीय आंतरधर्मीय सत्यशोधकी विवाह विभाग प्रा. राजेंद्र लोणे, विवेक जागर प्रकाशन व वितरण विभाग अर्जुन जाधव, अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका विभाग राजेश मगरे, मानसिक आरोग्य व्यवस्थापन विभाग डॉ. पद्माकर जगताप, विज्ञान बोधवाहिनी विभाग मिलिंद कंधारे, सांस्कृतिक अभिव्यक्ती विभाग एस. एस. पाटील, सोशल मीडिया व्यवस्थापन विभाग राजकिरण देशमुख, निधी व्यवस्थापन विभाग राजकुमार पडलवार यांच्यासह अनेकांची विविध विभागावर निवड करण्यात आली.

पान १ वरून

**शेतीसंदर्भात शेतकऱ्यांना...**

गौरवमूर्ती माधवराव पाटील यावेळी म्हणाले की, शरद पवार यांच्या हस्ते गौरव व्हावा ही इच्छा फक्त एवढ्यासाठीच होती की, त्यांनी मराठवाड्याला भरभरून दिले, त्यावर प्रकाश टाकणे हे मला माझे कर्तव्य वाटले. जीवनात चांगल्याला चांगली माणसं भेटतात. आपण स्वतःत परिवर्तन केले तर जग बदलते. माणसाचा जन्म इतरांसाठी असतो ही जीवनसाक्षरता मला कळाली हेच माझ्या आयुष्याचं फलित आहे. यावेळी शंकरआण्णा धोंडगे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वृषाली किन्हाळकर, चंदू मारकवाड, आदी मान्यवरांनी समयोचित मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात कमलकिशोर कदम यांनी माझी एका कर्मयोग्याची आत्मकथा असल्यामुळे ग्रामविकासाची शेती हे माधवराव पाटील शेळगावकरांचे आत्मचरित्र आधुनिक भगवद्गीता असल्याचे सांगितले.

# गजानन झाडे यांना आरोग्यरत्न पुरस्काराने सन्मानित

**नांदेड (प्रतिनिधी)** – आरोग्य विभाग, जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत कार्यरत गजानन धोंडीराम झाडे (औषध निर्माण अधिकारी) यांना त्यांच्या मागील पंधरा वर्षाच्या रुग्णसेवेची प्रामाणिक कष्टाबद्दल दखल घेऊन सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासनाने त्यांना वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

यशवंतराव चव्हाण सभागृह, मुंबई येथे प्रकाश आबिटकर, आरोग्य मंत्री, मेघनाताई साकोरे-बोर्डिकर राज्यमंत्री, संजय घाडी, प्रधान सचिव आरोग्य ई.रविंद्रन, आयुक्त कादंबरी बलकवडे, डॉ. नितीन अंबाडेकर, डॉ. विजय कंदेवाड संचालक आरोग्य सेवा इ.मान्यवरांच्या हस्ते या सोहळ्यात त्यांना एक लाख रुपयांचा धनादेश, सन्मान चिन्ह आणि मानपत्र असा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न' पुरस्काराने सन्मानित केले जाते, जो जनआरोग्य सेवांमधील उत्कृष्ट कार्यासाठी दिला जातो. त्यांनी आजपर्यंत हिमायतनगर, हदगाव तसेच किनवट सारख्या अदिवासी दुर्गम भागात सर्व राष्ट्रीय व राज्यस्तरीय आरोग्य कार्यक्रमां बरोबरच, सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरण, आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबीर, व्यसनमुक्ती शिबीरे, विविध धार्मिक स्थळी आरोग्य विषयक जनजागृती करून ग्रामीण भागात उत्कृष्ट प्रकारे आरोग्य सेवा बजावाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# पुणेगाव येथे मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशोहरण, वर्धापनदिनानिमित्ताने आज धार्मिक कार्यक्रम

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –संत सोमगीर महाराज व गुरु बाळगिर महाराज मठ संस्थान पुणेगाव येथे मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण वर्धापन दिनानिमित्त अखंड दत्तनाम सप्ताह व सव्वाखंडी आनंद दत्त महापूजा कार्यक्रम नुकताच पार पडला. तसेच मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी रोजी गावातून मिरवणूक, महापूजा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

मौजे पुणेगाव येथे श्री दत्त मंदिर व अनुसया माता, दत्त महाराज व बाळगीर महाराज यांची मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण वर्धापन दिनानिमित्त अखंड दत्त नाम सप्ताहाला मंगळवार, दि. १७ रोजी प्रारंभ झाला असून, या सप्ताहाची सांगता मंगळवार, दि.२४ फेब्रुवारी २६ रोजी होणार आहे. या सप्ताहात दैनंदिन कार्यक्रमात भुपाळी, पारायण, दुपारी प्रवचन, सायंकाळी आनंद पाठ, महापूजा, रात्री ९ ते ११ कीर्तन कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले आहे.

आनंदवासी रामगिर महाराज, गुरु दत्तगिर महाराज मठ संस्थान पुणेगाव, आनंद दत्त सवाखंडी महापूजेचे आचार्य श्री गुरुवर्य रुद्रगिर गुरु दयाळगीर महाराज मठ संस्थान पुणेगाव द.भ.प. रमेश म. माऊलीकर, प्रववचनकार द.भ.प. महेश गाजवेद, भ.प. आनंदवन महाराज. तुप्पा, द.भ.प. गुरु रुद्रगिर म. पुणेगाव (किवळा) दभप शामसुंदर महाराज आष्टीकर, श्रीमंहत १००८ अषटकौशल्य नारायण गिरी महाराज माहुर यांचे प्रवचन व कीर्तन आयोजित करण्यात आले आहे.

या आयोजित धार्मिक सोहळ्याला परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रूद्रगिर गुरू दयाळगिर महाराज मठ संस्थान किवळा व समस्त गावकरी मंडळी पुणेगावच्यावतीने एका प्रसिद्धीपत्रकानुसार करण्यात आले आहे.

# शिवार

# गहू कापणी करताना घ्यावयाची काळजी

**सध्या राज्यात बहुतांश भागामध्ये वेळेवर म्हणजेच नोव्हेंबर महिन्यात पेरणी झालेला गहू आणि खपली गहू काढणीसाठी तयार आहे. त्याचबरोबर उशिरा पेरणी झालेला गहू फुलोऱ्यात किंवा दाणे भरण्याच्या अवस्थेत दिसत आहे. गहू काढणीची योग्य वेळ जाणून त्याचे वेळी काढणी करणे आवश्यक आहे.**

लवकर काढणी केली असता गव्हाचे दाणे पूर्ण परिपक्व होत नसल्यामुळे पिकाचे उत्पादन घटते. याउलट गव्हाची कापणी उशिरा झाल्यास धान्य नासाडीची समस्या उद्‌भवू शकते. या वर्षी अगदी पाण्याच्या कमतरतेमध्येही शेतकऱ्यांनी चांगल्या प्रकारे जोपासलेल्या गव्हाचे चांगले उत्पादन मिळण्यासाठी काढणीच्या या टप्प्यात योग्य ते काळजी घ्यावी. लागवड क्षेत्र कमी असल्यामुळे या वर्षी गव्हाला चांगले दर मिळण्याची शक्यता दिसत आहे. उशिरा पेरणी झालेल्या गव्हामध्ये सध्या ओंब्या बाहेर पडल्या आहेत. पाण्याची पुरेशी उपलब्धता असेल तर अशा वेळी वारा नसताना पाण्याची पाळी देणे लाभदायक ठरेल, अन्यथा गहू लोळण्याची शक्यता असते. ओंब्या बाहेर पडल्यानंतर पिकास तुषार सिंचन पद्धतीने पाणी देऊ नये. त्यामुळे गव्हाच्या दाण्याची चकाकी कमी होते. एकूणच गहू दर्जात घट होते. अशा अवस्थेत १९:१९:१९ (विद्राव्य खत) किंवा डी.ए.पी. २० ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. सिंचनाच्या जोडीला अन्नद्रव्यांची मात्रा मिळाल्याने दाण्याचा आकार वाढून चकाकीही वाढण्यास मदत होते. पिकाच्या दाणे भरण्याच्या अवस्थेत तुषार सिंचनाने पाणी देणे टाळावे. कारण त्यामुळेही पीक लोळण्याची व गव्हाचा दाणा पांढरा पडण्याची शक्यता असते. गव्हाचे दाणे कडक झाले असल्यास पाणी देणे थांबवावे. कारण पाणी पाट पद्धतीने द्यावे लागते. सध्या फेब्रुवारी आणि मार्चमधील वाऱ्यांचा वेग अधिक असतो. त्यामुळे पीक आडवे होण्याची किंवा लोळण्याची शक्यता अधिक असते. महाराष्ट्रात साधारणतः ११० ते १२० दिवसांमध्ये गहू पक्व होतो. गव्हाच्या काही जातींचे दाणे पीक पक्व झाल्यानंतर शेतात झडून नुकसान होते. तसे होऊ नये म्हणून पीक पक्व होण्याच्या २ ते ३ दिवस आधी गव्हाची कापणी करावी. कापणीवेळी दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ टक्के असावे. गव्हाची मळणी यंत्राच्या साह्याने करावी. मळणी करताना गव्हाचे दाणे फुटणार नाहीत याची काळजी घ्यावी. अलीकडे गव्हाची कापणी, मळणी आणि उफणणी एकाच वेळी करणारी यंत्रे (कंबाईन हार्वेस्टर) उपलब्ध झाली आहेत. त्यातून कापणी केल्यानंतर सरळ धान्याची पोती भरून मिळतात. मात्र ती अद्याप मुबलक नसल्याने शेतकरी पक्वता गाठण्याआधीच किंवा यंत्राची वाट पाहत फार उशिरा काढणी करतात. या दोहोंमुळे नुकसान होऊ शकते. त्याचे या यंत्रामध्ये आधी कापणी केलेल्या गव्हाचे मिश्रण होणार नाही, याची काळजी घ्यावी.

## साठवण

गहू साठविण्यासाठी ओलावा, उंदीर, पक्षी आणि अस्वच्छतेपासून मुक्त अशा सुरक्षित जागेची निवड करावी. साठवण्यासाठी धातूच्या पत्र्यापासून अथवा सिमेंटपासून बनवलेल्या सुधारित कोठींचा वापर करावा. पोती स्वच्छ साफ करूनच त्यात धान्य भरावे. पोती लाकडी फळ्या अथवा पॉलिथिनच्या चादरीवर ठेवावीत. साठवणुकीच्या काळात गव्हामध्ये किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी त्यात ओलाव्याचे प्रमाण १० टक्के इतके कमी असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी मळणीनंतर गव्हास तीन ते चार दिवस चांगले ऊन देऊन ओलाव्याचे प्रमाण कमी करावी. ऊन दिल्यावर गहू थंड होऊ द्यावा. त्यानंतर योग्य पद्धतीने साठवण करावी. पुढील वर्षी पेरणीसाठी मागील वर्षीचा गहू बियाणे म्हणून वापरायचा असल्यास गहू बियाण्यास प्रति किलो १० ग्रॅम वेखंड भुकटी याप्रमाणे बीजप्रक्रिया अवश्य करावी.

## खपली गव्हाची काढणी करताना...

खपली गव्हाची कापणी करताना शक्यतो सकाळी करावी. सकाळी वातावरणात ओलावा असल्यामुळे ओंब्या गळून पडत नाहीत. उन्हामध्ये तापमान वाढलेल्या आणि कोरड्या वातावरणात ओंब्या गळण्याची शक्यता जास्त असते. काढणी केल्यानंतर पेंड्या एक ते दोन दिवस उन्हामध्ये वाळवून मळणी यंत्राने मळणी करावी. आता कंबाइन हार्वेस्टरनेसुद्धा खपली गव्हाची काढणी करता येते. मात्र त्यासाठी त्यातील सेटिंग योग्य प्रकारे बदलून घ्यावेत. मळून तयार झालेला खपली गहू मोठ्या चाळणीवर टाकून त्यातील बाहेर आलेले गहू व काडीकचरा वेगळा करावा. यामुळे उत्पादित मालाला चांगला दर मिळण्यास मदत होते. तयार केलेली खपली उन्हात चांगली वाळवून पोत्यात अगर कोठीत ठेवावी. घरी खाण्यासाठी लागेल तशी भरडून आणावी. भरडताना जास्त तुकडे होऊ नयेत याची काळजी घ्यावी. बाजारात खपली भरडण्यासाठी छोटे हलर उपलब्ध आहेत. त्याचा वापर शेतकऱ्यांनी करावा.

---

# दीर्घ काळ गहू साठवण करायची कशी?

**भारत हा जागतिक पातळीवर चीननंतर दुसऱ्या क्रमांकाचा गहू उत्पादक देश आहे. पीक लागवडीपासून काढणीपर्यंत मोठ्या प्रमाणात काळजी घेतलेल्या गहू धान्यांच्या साठवणीबाबत आपल्याकडे तितक्या प्रमाणात लक्ष दिले जात नाही. कापणीनंतर साठवणुकीपर्यंतच्या काळात सुमारे १० टक्के, साठवणुकीच्या योग्य सोयीअभावी सुमारे ६ टक्के इतके धान्य खराब होते. वेळेवर काढणी, योग्य यंत्रांचा वापर, सुरक्षित साठवणूक आणि साठवणीतील किडीच्या नियंत्रणासाठी वेळीच उपाययोजना यातून हे नुकसान कमी करणे शक्य आहे.**

कापणीपासून गहू साठवणुकीची प्रक्रिया सुरू होते. कारण कापणीसाठी वापरलेली उपकरणे, पर्यावरणीय परिस्थिती (आर्द्रता आणि तापमान) हे घटक महत्त्वाची भूमिका बजावतात. खापरा बीटल, सुरवंट आणि उंदीर हे प्रामुख्याने धान्याच्या गुणवत्तेवर परिणाम करतात. हे किडे बियाणे आणि माती या व्यतिरिक्त काढणी, मळणीसाठी वापरल्या जाणाऱ्या यंत्राद्वारे साठवणीमध्ये पोहोचू शकतात. किडे आणि सूक्ष्मजीव आणि बुरशींच्या वाढीसाठी दाण्यामधील ओलाव्याचे अधिक प्रमाण, उच्च तापमान हे महत्त्वाचे ठरतात.

- » ओलावा : धान्य साठवणीचा मोठा शत्रू म्हणजे हवेतील बाष्प. हवेत आर्द्रता (बाष्पाचे प्रमाण) जितकी अधिक, तितके धान्य खराब होण्याचा व सडण्याचा धोका अधिक असतो. ओलावा किंवा बाष्प असल्यामुळे धान्यावर किडे, जिवाणू व कवकांची वाढ सहजपणे होऊ लागते. धान्यातील कर्ब पदार्थांचे व प्रथिनांचे विघटन होते. किड्यांचे मलमूत्र व अन्य उत्सर्जक पदार्थ, अंडी यामुळे धान्यांची प्रतवारी खराब होते. हे टाळण्यासाठी धान्याच्या कणगी किंवा गोदामांच्या भोवती कमीत कमी २ ते ३ मीटर त्रिज्येचा परिसर नेहमीच कोरडा राहील, अशी दक्षता घ्यावी. विशेषतः पावसाळ्यात अधिक सावधगिरी बाळगावी लागते.
- » पोती आणि कंटेनर : जुन्या गोण्यांचा वापर गहू साठवण्यासाठी करण्यापूर्वी त्यात किडे किंवा त्यांची अंडी नसल्याची खात्री करावी. साठवणीसाठी वापरल्या जाणाऱ्या डबा किंवा कंटेनरला छिद्र असू नयेत. त्यातून नवीन कीटक शिरकाव करू शकतात.
- » उंदीर : उंदीर आकाराने लहान सस्तन प्राणी असला तरी तो जितके खातो, त्याच्या कितीतरी अधिक धान्य खराब करतो. तो उभे पीक आणि साठवणीचे धान्य दोन्हींचे नुकसान करतो. उंदरांचे मलमूत्र आणि केस धान्यांमध्ये मिसळल्यास धान्य खराब होते.
- » कीटक : गहू पिकावर प्रादुर्भाव करणाऱ्या किडींप्रमाणे काढणीच्या काळात धान्यावर अंडी घालणारेही अनेक कीटक आहेत. ही अंडी साठवणीमध्ये आल्यानंतर काही काळातच त्यातून पतंग किंवा सुरवंट बाहेर पडतात. अशा साठवणीतील कीटकांच्या सुमारे ५० प्रजाती असून, त्यापैकी अर्धा डझन प्रजाती आर्थिकदृष्ट्या मोठे नुकसान करणाऱ्या आहेत.

## साठवणी दरम्यान खबरदारी

साठवणगृहातील धुरीकरणाचे काम शासकीय पातळीवर अधिकृत केलेल्या संस्था किंवा प्रशिक्षित व्यक्तीकडून करून घ्यावे. कारण साठवणीमध्ये वापरले जाणारे ॲल्युमिनिअम फॉस्फाइड (५६ टक्के) हे विषारी रसायन आहे. धुरीकरणाचे ठिकाण निवासी क्षेत्रे, प्राणी आणि शयनकक्षांपासून दूर असावे. साठवणगृहाच्या सर्व खिडक्या आणि स्कायलाइट्स व्यवस्थित बंद करा आणि सील करा. मास्क आणि हातमोजे घालून गोळ्या ठेवून तुमचा श्वास रोखून त्वरित बाहेर पडावे. मागे दरवाजे घट्ट बंद करावेत. धुरीकरणासाठी वापरल्या जाणाऱ्या रसायनांना उघड्या हातांनी स्पर्श करू नये. धुरीकरणानंतर हात व तोंड साबणाने पूर्णपणे स्वच्छ करावेत.

## सुरक्षितपणे गहू साठविण्याचे काही मार्ग

**देशाच्या सर्व भागांतील वातावरण आणि पर्यावरणाचा विचार करून धान्य संकलन आणि हाताळणीसाठी योग्य तंत्रज्ञान आणि साठवण संरचना विकसित करण्यात आल्या आहेत. काढणीनंतर धान्याचा वापर करण्यासाठी, धान्य साठवणुकीसाठी पारंपरिक आणि आधुनिक साठवण पद्धती वापरल्या जातात. भारतात ६० ते ७० टक्के गहू कोठी, कुथला, बुखारी, धुसी, खानकी, लाकडी चेस्ट, बोरे, पुसा बीन, पंतनगर बीन, लुधियाना बीन, हापूर बीन आणि भूमिगत साठवणगृहात साठवला जातो. उर्वरित ३०-४० टक्के गहू भारतीय अन्न महामंडळ, केंद्रीय वखार महामंडळ किंवा राज्य वखार महामंडळाच्या मालकीच्या गोदामांमध्ये साठवला जातो. त्यात 'एफसीआय'द्वारे विकसित केलेल्या स्वदेशी पद्धतीत सायलो आणि 'कव्हर अँड प्लिंथ' (CAP) यांचाही समावेश होतो. साठवणीच्या योग्य पद्धतीचा अवलंब करण्याकडे शेतकऱ्यांनी लक्ष द्यावे. त्यासाठी काही बाबीचे पालन प्राधान्याने करावे. म्हणजे संभाव्य नुकसान टाळणे शक्य होते.**

1 गहू चांगला वाळवून साठवावा : साठवण्यापूर्वी गहू नीट वाळवा. साठवणुकीसाठी गव्हाची आर्द्रता ८ ते १० टक्के असावी. त्यापेक्षा जास्त आर्द्रता धान्यांमध्ये असणार नाही, याची काळजी घ्यावी. कारण ८ ते १० टक्क्यांपेक्षा जास्त ओलावा असल्यास बियांमध्ये श्वसन प्रक्रिया वाढते. परिणामी किडी व बुरशीचा प्रादुर्भाव वाढतो. साधारणपणे पावसाळ्यात गव्हामध्ये सुरसी, खापरा, जाळे हे कीटक आढळतात. कारण पावसाळ्यातील जास्त आर्द्रतेमुळे गहू मऊ होऊन किड्यांना सहजपणे खाणे शक्य होते.

2 जुनी पोती कशी वापरायची? : गहू किंवा धान्य साठवणीसाठी शक्यतो नवीन गोणी वापराव्यात. जुनी पोती किंवा गोण्यांचा वापर करण्याची वेळ आल्यास, अशा गोण्या १ टक्का मॅलेथिऑनच्या द्रावणात १० मिनिटे बुडवून चांगल्या कोरड्या केल्यानंतरच वापराव्यात. कोठी ३ ते ४ दिवस सूर्यप्रकाशात ठेवावी गहू साठवणीच्या ठिकाणी ओलावा राहू नये, यासाठी लोखंडी कोठी अथवा टाकी ३ ते ४ दिवस कडक उन्हात ठेवावी. या कडक उन्हामुळे कोठीतील किडी व त्यांच्या अवस्था नष्ट होतात. शक्यतो गहू घरापासून वेगळा साठवावा. शक्य नसल्यास धान्य घराच्या एका कोपऱ्यात थोड्या उंचावर साठवून ठेवावे.

3 टाकीत कडुलिंबाची पाने वापरणे : कमी प्रमाणात गहू साठवणीसाठी कडुलिंबाची पाने तळाशी एक किलो पसरून ठेवावी. त्यावर गहू भरून नंतर वरही कडुलिंबाची पाने पसरावीत. जास्त प्रमाणात गहू साठवण्यासाठी रासायनिक पद्धतींचा अवलंब करावा. त्यातही आधीच धान्याला किडीचा प्रादुर्भाव दिसत असेल, तर १० क्विंटल बियाण्यासाठी ॲल्युमिनिअम फॉस्फाइड ३ गोळ्या वापरल्या जाऊ शकतात.

## साठवणुकीतील किडी

- » सोंडे किडे : वैशिष्ट्यपूर्ण सोंडेमुळे तिला 'सोंडे भुंगेरे' हे नाव पडले आहे. जास्त प्रादुर्भाव झाल्यास धान्यातील तापमान वाढते. या किडीची अळी व प्रौढ दोन्ही धान्यांचे नुकसान करतात. मादी कीटक धान्याच्या दाण्यावर शेतामध्येच एक एक अंडे घालते. अंड्यातून बाहेर पडलेली अळी दाणे पोखरून उपजीविका करते. धान्याचे पीठ होते. प्रौढ भुंगेरे दाण्यावर गोलाकार छाप पाडून दाणे फस्त करतात.
- » दाणे पोखरणारी अळी किंवा टोपी भुंगेरे : या किडीची मादी भुंगेरे दाण्यावर अंडी घालतात. अळी दाण्यामध्ये शिरून दाणे फस्त करते. त्यामुळे फक्त टरफले राहतात. अळी प्रादुर्भावग्रस्त दाण्यामध्ये कोषावस्थेत जाते. प्रौढ भुंगेरे धान्याचे नुकसान करतात.
- » पतंग : या किडीची अळी फक्त साठवलेल्या धान्याचे नुकसान करते. ही अळी पांढऱ्या रंगाची असून, तिचे डोके पिवळे असते. अळी दाण्यावरील भेगांमधून दाण्यामध्ये प्रवेश करून आतील गाभा खाते. तिचे वास्तव्य नेहमी दाण्यातच राहते. ही कीड शेतामध्ये व साठवणीमध्येही दाण्याचे नुकसान करते. धान्य कोठ्या किंवा पोत्यामध्ये या किडीचा प्रादुर्भाव होतो.
- » खापरा भुंगेरे : या किडीची मादी दाण्यावर तसेच भिंतीवरील भेगांमध्ये अंडी घालते. अळी केसाळ असून ती दाणे पोखरते. परिणामी, दाण्याची टरफले शिल्लक राहतात. अळीच्या अंगावरील केस, शरीरावरील आवरण व विष्ठेमुळे धान्यास दर्प येतो. बाजारमूल्य कमी होते. खापरा भुंगेऱ्यामुळे होणारे नुकसान गोण्या किंवा पोत्यातील धान्याच्या वरील थरामध्ये आढळते. हिवाळ्यात अन्न नसल्यास किंवा प्रतिकूल हवामानात या किडीच्या अळ्या सुप्तावस्थेत जातात. ही सुप्तावस्था चार वर्षांपर्यंत टिकू शकते.
- » सिगारेट भुंगेरे : या किडीच्या अळीच्या अंगावर केस असतात. ही अळी धान्य व प्रक्रियायुक्त पदार्थामध्ये टाचणीच्या डोक्यासारखे गोलाकार छिद्र पाडून आतील अन्नावर उपजीविका करतात. धान्य व प्रक्रिया केलेल्या पदार्थांची प्रत खालावते.
- » पिठातील तांबडा/ लाल भुंगा : हे किडे व अळी प्रामुख्याने पिठावर आणि फुटलेल्या बियाण्यावर गुजराण करतात. न फुटलेले बियाणे ते खात नाहीत. या किडीमुळे साठवणुकीत दुर्गंध येते.
- » धान्याला छिद्र पाडणारा भुंगा : या किडीची अळी ही धान्याला वक्राकार छिद्रे पडलेली दिसतात. धान्यात मोठ्या प्रमाणात पीठ जमा झालेले दिसून येते. कधी कधी हे पीठ पोत्याच्या बाहेर सुद्धा आलेले दिसते.

## साठवणुकीसाठी मूलभूत उपाययोजना

गहू सामान्य तापमानात पूर्णपणे वाळल्यानंतरच साठवावा. उच्च तापमानाचा बियाण्याच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होतो. साठविलेल्या गव्हाचे सुरवंट, खापरा भुंगे, भुंगे आदींपासून संरक्षण करणे आवश्यक आहे. कारण ते गव्हाचे मोठे नुकसान करतात. पीक कापणीसाठी संसर्गमुक्त साधने आणि उपकरणे वापरावीत. साठवण खोलीमध्ये मॅलेथिऑन (४० मिलि), डी.डी.व्ही.पी. (४० मिलि), किंवा डेल्टामेथ्रीन (४० ग्रॅम) यांच्या साह्याने उपचार करावेत. २० मि.लि. मॅलॅथिऑन (५० टक्के प्रवाही) प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. बंद कोठारात ३० ग्रॅम प्रति क्विंटल या प्रमाणात सेल्फोस भुकटीचा वापर करावा. साठवण्याआधी, गहू तपासून कीटकांची उपस्थिती शोधावी. गव्हाला आधीच कीटकांचा प्रादुर्भाव झाला असेल, तर त्याला ॲल्युमिनिअम फॉस्फाइड (प्रति १० क्विंटल बियाण्यासाठी ३ गोळ्या) वापरून धुरीकरण करावे. ओलाव्याचा प्रभाव नाहीसा करण्यासाठी धान्याच्या गोण्या लाकडी फळ्या किंवा पॉलिथिन शीटवर ठेवाव्यात. धान्य कोठी किंवा डब्यात साठवायचे असेल तर कोरड्या कडुलिंबाच्या पानांचा वापर करणे ही देखील एक प्रभावी पद्धत आहे. पण साठवणूक केल्यानंतर डब्याचे तोंड बंद करून हवाबंद करणे अत्यंत आवश्यक आहे. धुरीकरणाच्या वेळी, फक्त उच्च दर्जाचे हवाबंद कव्हर, मल्टी-लेयर्ड कव्हर, मल्टी क्रॉस लॅमिनेटेड कव्हर वापरा. नवीन साठवणीच्या गव्हासोबत जुना गहू कधीही साठवू नका. उंदीर नियंत्रित करण्यासाठी सापळ्यांसोबतच रासायनिक पद्धतींचा अवलंब करावा. एका गोष्टीवर अवलंबून राहू नये. साठवणीनंतर दारे आणि खिडक्यांचे सांधे ओल्या मातीने व्यवस्थित बंद करा. वातानुकूलनासाठी योग्य ती रचना केलेली असावी. एका गोदामात एकाच प्रकारचे धान्य साठवावे.

# तालमणी डॉ. राम बोरगावकर यांना संगीत शंकर दरबार जीवन गौरव पुरस्कार जाहीर

**लातूर(प्रतिनिधी)** –नांदेडच्या श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने माजी केंद्रीय गृहमंत्री व माजी मुख्यमंत्री डॉ.शंकरराव चव्हाण आणि कै.सौ.कुसुमताई चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी संगीत क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या ज्येष्ठ कलावंताला संगीत शंकर दरबार जीवन गौरव पुरस्कारदिला जातो.

यावर्षीच्या या मानाच्या पुरस्कारासाठी लातूरचे जेष्ठ संगीततज्ञ तालमणी डॉ. राम बोरगावकर यांची निवड करण्यात आली आहे. रोख रक्कम, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह, शाल,श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

तालमणी डॉ.राम बोरगावकर हे गेली पाच दशके मराठवाडा संगीत कला अकादमी व रिसर्च सेंटर,सरस्वती संगीत महाविद्यालय, लातूर या संस्थांच्या माध्यमातून संगीत कलेच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. ते संगीत साधना,प्रचार व संगीत प्रसाराचे, संशोधनाचे काम निर्विघ्नपणे करीत आहेत. अवघ्या २४ व्या वर्षी देशभरातून सर्वाधिक गुण घेऊन विशेष प्राविण्याने तालशास्त्रात डॉक्टरेक्ट मिळविणारे ते मराठवाड्यातील पहिले तबलावादक आहेत. उदयोन्मुख कलावंतांना मंच मिळावे या उदात्त हेतूने गेल्या १७ वर्षापासून ते अखंड संगीत महायज्ञ लातूरमध्ये करतात. अद्यापपर्यंत त्यांनी संगीत क्षेत्रातील हजारो शिष्यांना घडविलेले डॉ.राम बोरगावकर हे ऑल इंडिया रेडिओ आणि टीव्हीचे ए ग्रेड कलावंत आहेत.

आंतरराष्ट्रीय संगीत संमेलन,मलेशिया, इंटरनॅशनल रोटरी क्लब संगीत संमेलन कोलंबो,श्रीलंका येथे त्यांनी आपली कला सादर केली आहे.याबरोबरच दुबई,युक्रेन,इंडोनेशिया, श्रीलंका, दोहा, कतार, व्हिएतनाम अशा विविध देशात त्यांनी संगीत क्षेत्रात जागतिक मंचावर भारताचे प्रतिनिधीत्व केले.संगीत विषयातील पीएच. डी. चे संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून ते आजही कार्य करत आहेत. याबरोबरच मुंबई येथे दोन वेळा मराठवाडा संगीत संमेलनाचे आयोजन केले आहे.त्यांच्या या कार्याची दखल घेत यापूर्वी महाराष्ट्र शासनाने त्यांना राज्य सांस्कृतिक पुरस्काराने गौरविले आहे. आंतरराष्ट्रीय सवाई गंधर्व महोत्सवात त्यांनी गेल्या १४ वर्षापासून सातत्याने हजेरी लावली आहे.

पद्मविभूषण प्रभा अत्रे,पद्मश्री शोभा गुर्टू,जितेंद्र अभिषेकी, पं.भीमसेन जोशी,गझल गायक भीमराव पांचाळे,गानसरस्वती किशोरीताई आमोणकर,पं.भीमसेन जोशी आदी जगविख्यात कलावंतांना त्यांनी साथसंगत केली आहे.

'संगीत शंकर दरबार जीवन गौरव पुरस्कार' बुधवार दि २५ फेब्रुवारी २०२६ रोजी कुसुम सभागृह, नांदेड येथे 'कुसुम महोत्सवात ' डॉ.राम बोरगावकर यांना प्रदान केला जाणार आहे. या पुरस्काराच्या घोषणेनंतर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोकरावजी चव्हाण साहेब,माजी मंत्री डी. पी.सावंत साहेब,श्रीमती अमिताताई चव्हाण, आमदार श्रीजया चव्हाण, तुकाराम पाटील, प्रा. शिवराज मोटेगावकर, रमेश बिरादार, डॉ.कल्याण बरमदे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. याबरोबरच मराठवाड्यातील ज्येष्ठ संगीत कलावंतांनीही त्यांचे अभिनंदन केले आहे.

---

# गुरु तेग बहादूर यांच्या शौर्यगाथेचे समूहगानातून अभिवादन

**सिंधुदुर्गनगरी (प्रतिनिधी)** – श्री गुरु तेग बहादूर यांनी तत्कालीन शासनकर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरुद्ध आवाज उठवत धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांसाठी आपले प्राण अर्पण केले. त्यांच्या या अद्वितीय बलिदानामुळे भारताच्या सांस्कृतिक व अध्यात्मिक अस्मितेचे रक्षण झाले. शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त शासन विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्यांचा गौरवशाली इतिहास जनतेपर्यंत पोहोचवत आहे. आजच्या समूहगानातून आपण गुरुंप्रती कृतज्ञता व्यक्त करत असून या उपक्रमातून नवप्रेरणा मिळत असल्याचे जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे म्हणाल्या.

'हिंद दी चादर' म्हणून ओळखले जाणारे गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त हा समूहगान उपक्रम कणकवली येथील विद्यामंदिर माध्यमिक प्रशाला येथे घेण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, धर्मनिरपेक्षता आणि मानवतेच्या मूल्यांची जपणूक करण्याची प्रेरणा निर्माण झाली.

या प्रसंगी तहसिलदार दिक्षांत देशपांडे, जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत, शिक्षणाधिकारी कविता शिंपी, मुख्याधिकारी गौरी पाटील, तसेच मुख्याध्यापक, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सहभागाचे कौतुक करून अशा उपक्रमांमुळे इतिहासातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांची माहिती नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचते, असे मत व्यक्त केले.

पुढे बोलतांना जिल्हाधिकारी श्रीमती धोडमिसे म्हणाल्या की, 'हिंद दी चादर' म्हणून ओळखले जाणारे गुरु तेग बहादूर हे शीख धर्मातील नववे गुरु होते. त्यांच्या जीवनकार्याने धर्मस्वातंत्र्य, मानवता आणि त्याग यांचे सर्वोच्च उदाहरण घालून दिले. प्रत्येकाला आपल्या श्रद्धेनुसार धर्म आचरण करण्याचा अधिकार आहे, ही त्यांची ठाम भूमिका होती. स्वतःच्या स्वार्थापेक्षा समाजहित मोठे मानावे. गरजूंना मदत करणे, दु:खींचे दुःख दूर करणे ही खरी ईश्वरभक्ती आहे. जात, पंथ, भाषा या पलीकडे सर्व मानव एकसमान आहेत. परस्परांप्रती आदर, करुणा आणि सहिष्णुता राखणे आवश्यक आहे. परिस्थिती कितीही कठीण असली तरी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडावे आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवावा. गुरु तेग बहादूर यांच्या शिकवणीमधून आपल्याला धैर्य, सहिष्णुता आणि मानवतेचा मार्ग मिळतो. त्यांचे जीवन हे धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांसाठीच्या बलिदानाचे तेजस्वी प्रतीक आहे असेही त्या म्हणाल्या.

---



भोकर नगरपरिषद,भोकर जि. नांदेड

मुख्य प्रशासकीय इमारत

साईबाबा पेट्रोलपंप समोर, नांदेड रोड, भोकर ता. भोकर जि. नांदेड- 431801.

ई-मेल :- cobhokar@gmail.com

दुरध्वनी क्रमांक कार्यालय (02467) 222299 -223399

जावक क्रमांक :- 978

दिनांक : 23 FEB 2026

## ई-निविदा सूचना ( तिसरी वेळ )

(2025-26)

मुख्याधिकारी, नगर परिषद भोकर जि.नांदेड यांच्या वतीने भोकर नगरपरिषद अंतर्गत भोकर शहरातील मोकाट श्वान पकडून त्यांची नसबंदी व अँन्टी रेबीज लसीकरण करणे या कामाकरिता ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कार्यालयीन वेळेत दि. 24/02/2026 ते दि 04/03/2026 पर्यंत मागविण्यात येत आहेत.

दिनांक - 23 /02/2026

मुख्याधिकारी
नगर परिषद भोकर जि.नांदेड

---

# झाडे लावा, झाडे जगवा

---

## जाहीर प्रगटन

मौजे तरोडा खुर्द ता. जि. नांदेड मनपा हद्दीतील गट नं. ९८ मधील शिवराय पार्क शिवरायनगरमधील प्लॉट नं. ८० व ५९ ज्याची साईज ३० बाय ५० असून, एकूण क्षेत्रफळ १५०० चौरस फुटाचा प्लॉट निझार नुरुद्दीन लालाणी यांच्याकडून काशिनाथ तुकाराम बोंगाणे व श्री तुकाराम काशीनाथ बोंगाणे यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून, बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

**प्लॉट नंबर ८० ची चतु:सिमा**
पूर्वेस- प्लॉट नं. ८१ आहे
पश्चिमेस- प्लॉट नं. ७९
दक्षिणेस-२० फुटाचा रोड,
उत्तरेस-प्लॉट नं. १०३ आहे.

**प्लॉट नंबर ५९ ची चतु:सिमा**
पूर्वेस- प्लॉट नं. ५८ आहे, पश्चिमेस- प्लॉट नं. ६०
दक्षिणेस-प्लॉट नं. ५३, उत्तरेस-२० फुटाचा रोड.

तरी वरील चतु:सिमेच्या आतील प्लॉटबद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या उजर/आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत करून घेण्यात येईल. करिता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**काशीनाथ तुकाराम बोंगाणे**
**तुकाराम काशीनाथ बोंगाणे**
**मो. ९४२३७५९९१७**

---

## जाहीर प्रगटन
### (सौदाचिठ्ठी आधारे)

मौजे पुयणी ता. जि. नांदेड हद्दीतील गट नं. १३४ मधील प्लॉट नं. ३६ साईज १५ बाय ४० एकूण क्षेत्रफळ ६०० चौरस फुटाचा प्लॉट सुरेश आनंदराव हवेलीकर रा. खंडोबा चौक तरोडा बु. नांदेड यांचेकडून मारोती बालाजी दुंतूलवार रा. कौठा ता. कंधार, जि. नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून, बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

**प्लॉटची चतु:सिमा**
पूर्वेस- प्लॉट नं. ४१ आहे
पश्चिमेस- २५ फुट रुंद रोड
दक्षिणेस-सदरील प्लॉटचा उर्वरित भाग.
उत्तरेस-प्लॉट नं. ३७ आहे.

तरी वरील चतु:सिमेच्या आतील प्लॉटबद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या उजर/आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत करून घेण्यात येईल. करिता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**मारोती बालाजी दुंतूलवार**
**रा. कौठा, ता. कंधार, जि. नांदेड**

---

## जाहीर प्रगटन

सहयोग सहकारी पतपेढी संस्था म. पंचशिल विद्यालय नांदेड या संस्थेच्या सर्व सभासद/मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणुक सन २०२६-२०३१ या कालावधीचा निवडणुक कार्यक्रम दिनांक २३/०२/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येत असुन उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा कालावधी दिनांक २३/०२/२०२६ ते २७/०२/२०२६ आहे. प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक ०२/०३/२०२६ रोजी करण्यात येणार असुन वैध नामनिर्देशन पत्राची यादी दि. ०३/०३/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी दिनांक ०३/०३/२०२६ ते १७/०३/२०२६ आहे. निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतीम यादी प्रसिध्दी दिनांक १८/०३/२०२६ करण्यात येणार आहे. आवश्यकता असल्यास मतदान दिनांक २९/०३/२०२६ रोजी उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड यांचे कार्यालयात घेण्यात येणार असून मतदान संपल्यानंतर लगेच मतमोजणी करण्यात येणार आहे. व निकाल जाहीर करण्यात येणार आहे संस्थेच्या निवडणुकीचा निवडणुक कार्यक्रम संस्थेच्या व उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड यांचे कार्यालयाचे नोटीस बार्डावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे यांची सर्व सभासद/मतदारांना नोंद घ्यावी.

(ए. वाय. दीक्षित)
निवडणूक निर्णय अधिकारी
सहयोग सहकारी पतपेढी संस्था म.
पंचशिल विद्यालय नांदेड ता. जि. नांदेड

---

## जाहीर प्रगटन

श्री साई शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्था म. नांदेड ता. जि. नांदेड या संस्थेच्या सर्व सभासद/मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणुक सन २०२५- २०३० या कालावधीचा निवडणुक कार्यक्रम दिनांक १५/०९/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येत असुन उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा कालावधी दिनांक १६/०९/२०२५ ते २३/०९/२०२५ आहे. प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक २४/०९/२०२५ रोजी करण्यात येणार असुन वैध नामनिर्देशन पत्राची यादी दि. २५/०९/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी दिनांक २५/०९/२०२५ ते ०९/१०/२०२५ आहे. निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतीम यादी प्रसिध्दी दिनांक १०/१०/२०२५ करण्यात येणार आहे. आवश्यकता असल्यास मतदान दिनांक १९/१०/२०२५ रोजी उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड यांचे कार्यालयात घेण्यात येणार असुन मतदान संपल्यानंतर लगेच मतमोजणी करण्यात येणार आहे. व निकाल जाहीर करण्यात येणार आहे संस्थेच्या निवडणुकीचा निवडणुक कार्यक्रम संस्थेच्या व उपनिबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड यांचे कार्यालयाचे नोटीस बार्डावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे यांची सर्व सभासद/मतदारांना नोंद घ्यावी.

(एस.एल. कार्लेकर)
निवडणुक निर्णय अधिकारी
श्री साई शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी
सहकारी पतसंस्था म. नांदेड ता. जि. नांदेड

---

## Change In Name

My Old Name is NISAR ABDUL AJIJ Now I am Changing as a new Name NISAR AJIJ KHURESHI Hence Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same. FULL ADDRESS- MARKAJ MASJID TAMSA TQ HADGAON DIST NANDED MS 431712. MOB. NO. 9011517708

---

## कागदपत्रे हरवले आहे

माझे विशाल शिवाजीराव निवडंगे या नावाची दहावी किसी, आईचा नावाने शेतीबाबत संमती पत्र,पेन ड्राईव्ह, वरील कागदपत्रे दुचाकीवरून प्रवास करत असताना हरवले आहेत,कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता- विशाल निवडंगे,**
सरपंच नगर नांदेड,
मोबाईल नंबर ९९२१८११९७५

---

## चौकशीची जाहीर नोटीस

अर्ज क्रमांक ३५४/१९/२०२६

सार्वजनिक न्यासाचे नांव : ठकाई बहुउदेशिय सेवाभावी संस्था नाईक नगर नांदेड ता.जि. नांदेड

अर्जदाराचे नाव : चंद्रमुणी विठ्ठलराव कांबळे

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड, विभाग नांदेड हे वर नमुद केलेल्या अहवाल अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१. वर नमूद केलेला सार्वजनिक न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२. खालील निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

अ) जंगम मिळकत (वर्णन) : अर्जदार यांच्याकडे सभासद फी रुपये १०५७/- जमा आहेत.

ब) सदर मिळकत (वर्णन) :

सदरच्या चौकशी प्रकरणामधे कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देण्याचा असेल त्यांनी त्याची लेखी कैफियत हि नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखे पासून तीस दिवसाच्या आत या कार्यालयाच्या पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास कांही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुर्ण केली जाईल व अर्जाच्या निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जाईल. ही नोटीस माझ्या सहिनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड याचे शिक्यानिशी आज दिनांक २३/०२/२०२६ रोजी दिली.

(श्रीरामे बी. एन)
वरिष्ठ लिपिक

संजय सु. जोशी
अधीक्षक

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नांदेड विभाग, नांदेड

---



कार्यालय देगलूर नगरपरिषद देगलूर जि.नांदेड

फोन नं.(02463) 257624 फॅक्स नं.(02463) 255777 E- Mail codegloor@gmail.com

जा.क्र/न.प्रा/वि.वि./ / 2026

दिनांक:-23/02/2026

### जाहीर निविदा सूचना

नगरपरिषद कडून सन 2025-26 या कालावधी मध्ये खालील नमूद कामाचे विहीत मुदतीत निविदा दरपत्रक मागविण्यात येत आहे. तरी संबंधित कंत्राटदार यांनी द्वी-लिफाफा पदधतीने कोटेशन दर सादर करावे. या बाबतची तपशील खालील प्रमाणे आहे.

| अनु क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | अनामत रक्कम | निविदा फॉर्म कींमत |
|---|---|---|---|---|
| 1 | Technical Estimate for Errection of New LT line At Dumping Ground under Degloor Urbn unit under Degloor Sub-Division under DDF-1.3% Scheme | 1,54,645.00 | 2,000.00 | 1,000.00 |
| 2 | Technical Estimate For New LT line At Vishal Nagar And Area under Degloor Urban unit under Degloor Sub-Division under DDF-1.3% Scheme | 3,68,578.00 | 3,500.00 | 1,000.00 |

**नियम व अटी :-**

1. निविदा फॉर्म विक्री कार्यालयीन वेळेत दिनांक 24/02/2026 ते दिनांक 03/03//2026 सायंकाळी 04:00 वाजेपर्यंत करण्यात येईल.
2. लिफाफा बंद निविदा दिनांक 03/03/2026 सायंकाळी 04:00 वाजेपर्यंत स्विकारण्यात येईल.
3. कोणतेही किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता रद्द करण्याचे अधिकार नगर परिषदने राखून ठेवले आहेत.
4. निविदेसोबत टेंडर फॉर्म पावती, अनामत रक्कम पावती, नोंदणी प्रमाणपत्र, आयकर भरल्याचे प्रमाणपत्र, पॅन कार्ड, जी.एस.टी. प्रमाणपत्र, आधार सादर करणे आवश्यक आहे.
5. लिफाफा क्र.01 मध्ये वरील संबंधित कागदपत्रे सादर करावी,
6. लिफाफा क्र.02 संबंधित कामाचे दरपत्रक सादर करावे.
7. लिफाफा क्र.01 हा कागदपत्रांचा तपशील असून सदरचे कागदपत्रे योग्य असल्यानंतर लिफाफा क्र. 02 (दरपत्रक) उघडणेची कार्यवाही करण्यात येईल.
8. कोरी निविदेतील दर सादर करताना विद्युत अभियंता न. प. देगलूर यांच्या सोबत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून सादर करण्यात यावे.

स्वा/-
मुख्याधिकारी
नगर परिषद देगलूर

---

## प्लॉट विकणे आहे

डी मार्ट समोरील शिवरोड लगत गट क्रमांक १३३ मधील सूर्यनगरातील दोन प्लॉट विकणे आहे. प्लॉट क्रमांक ५ व ६. साईज ३० बाय ६०. १८०० चौरस फुट. पूर्वमुखी प्लॉट योग्य किंमत आल्यास विकणे आहे.

**संपर्क- मो. ९३७०७४८६०२**

---

## पाहिजे

कुशल आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन/मोटार वाईडींग अनुभव व तसेच आय.टी.आय. टर्नर ट्रेड अनुभव किमान ५ वर्षे असावा. कमीत कमी वेतन १५,०००/- रू.

इच्छुकांनी खालील पत्यावर संपर्क करावा.

**-: संपर्क पत्ता :-**
**उषा इलेक्ट्रीकल वर्क्स,**
**सिडको एम.आय.डी.सी. नांदेड**
**मो.नं. ९९६०१२८१९१**

---

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लॅबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308

# नांदेडच्या मुजामपेठ रस्ता रुंदीकरण प्रकरणात नेमलेल्या चौकशी समितीलाच विभागीय आयुक्त कार्यालयात हजर राहण्याचे आदेश

- चौकशीदरम्यान अहवाल सादर न केल्याचा प्रकार येणार अंगलट
- विभागीय आयुक्त कार्यालयाने दिले जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)** –मुजामपेठ रस्ता रुंदीकरण प्रकरणात नेमलेल्या चौकशी समितीलाच विभागीय आयुक्त कार्यालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. चौकशी दरम्यान अहवाल सादर केला नसल्याचा प्रकार समितीच्या अंगलट येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

येथील भारतीय राष्ट्रीय महामार्ग क्रं. ३६१ रुंदीकरणासाठी गट क्रं. १७ मुजामपेठ नांदेड येथील मूल्यांकनाचा निवाडा केला असून, बेकायदेशीर पद्धतीने भूसंपादन करुन शासनाच्या कोट्यवधी रुपयांचा अपहार केल्याचा ठपका तत्कालीन अधिकाऱ्याविरुद्ध ठेवण्यात आला होता. याप्रकरणी चौकशी करून संबंधिताविरुद्ध कारवाई करावी अशी मागणी मागील चार वर्षापासून सुरू आहे, परंतु अद्याप निर्णय न झाल्याने हे प्रकरण प्रलंबित आहे. सदर प्रकरण निकाली काढावे म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त यांनी नांदेड जिल्हाधिकारी यांना अर्धशासकीय पत्र पाठविले होते. या प्रकरणात आजपर्यंत ११ स्मरणपत्र जिल्हाधिकारी कार्यालयाला पाठविण्यात आले. मात्र नेमलेल्या चौकशी समितीने योग्य अभिप्राय न दिल्याने अखेर विभागीय आयुक्त कार्यालयाचे सह आयुक्त राजेश काटकर यांनी समितीचे अध्यक्ष आणि सदस्यांनी सर्व अभिलेखासह २५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्तांसमोर हजर राहण्याचे पत्र जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांना पाठविण्यात आले आहे.

या प्रकरणात शेख एजाज बाबू यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने हे पत्र पाठविण्यात आले आहे. तत्कालीन अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एकूण ७ अधिकारी, कर्मचारी यांची समिती नियुक्त करुन सदर समितीने सादर केलेल्या एकत्रित फेरचौकशी अहवाल व सदर अहवालाशी सहमत असल्याबाबत अभिप्राय नोंदवून अहवाल या कार्यालयास सादर केला होता. तथापी, सदर अहवालासोबत कोणताही पुरावा सादर केला नसल्याने, प्रकरणाच्या सत्यतेबाबत तपासणी, पडताळणी विभागीय कार्यालयास करता येत नसल्याने तक्रारनिहाय पुरावा कागदपत्र सादर करण्यास कळविले होते.

यापूर्वी सादर केलेल्या चौकशी अहवालातील बाबी व अभिप्राय यांची पडताळणी, तपासणी करुन त्याबाबत आपले स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल अद्याप प्राप्त झाला नाही. प्रकरणात जवळपास चार वर्ष कालावधी लोटला असून, सदर प्रकरण या कार्यालयाचे स्तरावर प्रलंबित आहे.

बेकायदेशीर भूसंपादन करून कोट्यवधी रुपयांच्या अपहार केल्याप्रकरणी नियुक्त केलेल्या चौकशी समितीने ही योग्य चौकशी न करता प्रकरण प्रलंबित ठेवल्याने अखेर छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयातील सहआयुक्त राजेश काटकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्राद्वारे कळविले आहे. चौकशी समिती आणि सदस्य यांनी आपल्या चौकशी अभिलेखासह हजर राहण्याचे आदेश देण्यात आल्याने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकाऱ्यांची चांगलीच धावपळ पहावयास मिळाली.

# पोक्सो प्रकरणात एकास उच्च न्यायालयात २० वर्षांची शिक्षा

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्हा न्यायालयातील अतिरिक्त सत्र न्यायाधीश रविंद्र पांडे यांनी २ वर्षापूर्वी पोक्सो कायदा कलम ६ (२) प्रमाणे एका आरोपीस ७ वर्षाची शिक्षा दिली होती. यात उच्च न्यायालय छत्रपती संभाजीनगर येथील न्यायमूर्ती रजनिश आर. व्यास यांनी ही शिक्षा कायम ठेवली, पण पोक्सो कायद्यातील कलम ६ प्रमाणे असलेली २० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा दिली आहे.

कंधार तालुक्यातील बहाद्दरपुरा येथील संतोष भंडारे या चालकावर एका अल्पवयीन बालिकेसोबत अत्याचार केल्याच्या प्रकरणात नांदेड जिल्हा न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले होते. या दोषारोपानुसार संतोष भंडारे विरुद्ध विशेष सत्र न्यायालयात खटला क्रमांक २६/२०२२ नांदेड जिल्हा न्यायालयातील अतिरिक्त सत्र न्यायाधीश रवींद्र पांडे यांच्याकडे चालला. या प्रकरणात ७ वर्षाची शिक्षा, ५ हजारांचा दंड सुनावला होता. या विरोधात सहाय्यक सरकारी वकील ॲड. मनिकुमारी बत्तुला (डांगे) यांनी या प्रकरणात उच्च न्यायालयात अपील दाखल केले. उच्च न्यायालयात अपील क्रमांक २६७/२०२४ ही पीडित बालिकेच्यावतीने दाखल करण्यात आली आणि अपील क्रमांक २४०/२०२४ आरोपी संतोष भंडारेच्यावतीने दाखल करण्यात आले. या अपील प्रकरणात उच्च न्यायालयाने निकाल देतांना किमान वैधानिक शिक्षा लावणे हे शिक्षा वाढ समजले जावू शकत नाही. तर ती कायद्याची सक्ती आहे, असे नमूद केले आहे.

## नायगाव तालुक्यात वादळी वाऱ्यासह सरी कोसळल्या; शेतकरी चिंतेत

**नायगाव बाजार (प्रतिनीधी)** – नायगाव तालुका परिसरात सोमवार, दि. २३ फेब्रुवारी रोजी अचानक अवकाळी पावसाने हजेरी लावत शेतकरी वर्गाची धांदल उडवली. सुमारे चारच्या सुमारास ढग भरून आले आणि काही क्षणांतच वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळल्या. मागील दोन दिवसांपासून हवामानात जाणवणारा बदल अखेर पावसात परिवर्तित झाला.

वादळी वाऱ्याचा वेग अधिक असल्याने काही ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटून पडल्याची माहिती आहे. ग्रामीण भागातही शेतकरी बांधवांनी शेतातील सुरू असलेली कामे थांबवून आसरा घेतला. दरम्यान, या अवकाळी पावसामुळे रब्बी हंगामातील पिकांवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. गहू, हरभरा, ज्वारी आदी पिके सध्या वाढीच्या व काढणीपूर्व अवस्थेत असल्याने पावसाचा फटका बसल्यास उत्पादन घटण्याची शक्यता आहे. काही शेतांमध्ये पिके आडवी झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत असून, पुढील हवामानावरच नुकसानाचे चित्र स्पष्ट होणार आहे.

## हिमायतनगर तालुक्यातील पारडी शिवारात वीज अंगावर पडल्याने महिलेचा दुर्दैवी मृत्यू

**नांदेड (प्रतिनिधी)**– हिमायतनगर तालुक्यातील पार्डी शिवारात सोमवारी सायंकाळी साडेपाचच्या दरम्यान अचानक वादळी वारे व अवकाळी पावसाचा जोर सुरू असताना वीज कोसळून एका महिलेचा या दुर्दैवी घटनेत मृत्यू झाला.

विशाखा सचिन येलकेवाड (वय अंदाजे ३० वर्षे) या शेतात हळद काढणीचे काम करत असताना ही दुर्घटना घडली. तलाठी संजय बिऱ्हाडे यांनी दिलेल्या माहितीनुसार हिमायतनगर शहर व तालुका परिसरात अचानक ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात होताच जोरदार कडकडाटासह वीज कोसळली. त्यात विशाखा येलकेवाड या गंभीर जखमी झाल्या. स्थानिकांनी तत्काळ त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले.

या घटनेमुळे पार्डी गावासह संपूर्ण हिमायतनगर तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे. येलकेवाड कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, गावकऱ्यांनी शोक व्यक्त केला आहे. घटनेची माहिती तलाठी यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली असून, महसूल विभागाकडून सकाळी पंचनामा करण्यात येणार आहे. दरम्यान, प्रशासनाकडून आपत्ती व्यवस्थापन व नैसर्गिक आपत्ती अनुदानाच्या माध्यमातून मृताच्या कुटुंबियांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंतीनिमित्त महापौरांनी राबविली स्वच्छता मोहीम

**नांदेड (प्रतिनिधी)**– स्वच्छता हाच खरा देव असा संदेश देणारे थोर समाजसुधारक राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त सोमवार, दि. २३ फेब्रुवारी रोजी महानगरपालिकेच्या महापौर कविता संतोष मुळे यांच्या वतीने शहरातील चैतन्यनगर परिसरात व्यापक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

महापौरांनी स्वतः हातात झाडू घेऊन या परिसरातील प्रमुख रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता केली. याप्रसंगी ‘स्वच्छता हीच खरी सेवा’ हा संदेश देण्यात आला. या मोहिमेत मनपा अधिकारी, विविध विभागांचे कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. यावेळी शहराला स्वच्छ ठेवण्यासाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांचा यावेळी महापौरांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना महापौरांनी सांगितले की, गाडगे बाबांनी आयुष्यभर स्वच्छतेचा आणि प्रबोधनाचा विचार मांडला. केवळ जयंतीपुरते मर्यादित न राहता, प्रत्येक नागरिकाने आपला परिसर स्वच्छ ठेवून खऱ्या अर्थाने बाबांना मानवंदना द्यावी. शहरातील विविध प्रभागांमध्येही नगरसेवकांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबवून साचलेला कचरा आणि नाल्यांची स्वच्छता करण्यात आली.

याप्रसंगी महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना कचरा वर्गीकरण करण्याचे आणि सार्वजनिक ठिकाणी घाण न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी महापौर प्रतिनिधी संतोष मुळे, नगरसेवक सतीश देशमुख, सहाय्यक आयुक्त मो. गुलाम सादिक व स्वछता निरीक्षक यांची उपस्थिती होती.

## नांदेड विभागात आरपीएफकडून ऑपरेशन यात्री सुरक्षा व ऑपरेशन अमानत अंतर्गत कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** – दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने ऑपरेशन यात्री सुरक्षा व ऑपरेशन अमानत अंतर्गत उल्लेखनीय यश मिळवून प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबतची आपली कटिबद्धता पुन्हा अधोरेखित केली आहे.

१८ फेब्रुवारी २०२६ रोजी रेल्वे संरक्षण बल/नांदेड व शासकीय रेल्वे पोलीस/नांदेड यांच्या संयुक्त पथकाने हजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक ०१ वर प्रवाशांच्या सामानांची चोरी करण्याचा प्रयत्न करत असताना दोन संशयित आरोपींना अटक केली. दोन्ही आरोपींना पुढील कायदेशीर कारवाईसाठी शासकीय रेल्वे पोलीस/नांदेड यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले असून संबंधित कलमान्वये गुन्हे दाखल करून तपास सुरू आहे.

त्याच दिवशी, छत्रपती संभाजीनगर स्थानकावर प्लॅटफॉर्म क्रमांक ०२ वर ट्रेन क्रमांक १६७३४ (ओखारामेश्वरम साप्ताहिक एक्सप्रेस) संदर्भात निगराणी दरम्यान एक सराईत गुन्हेगार चोरीचा रू. ९,०००/- किमतीचा मोबाईल फोनसह अटकेत घेण्यात आला. सदर आरोपीचा संबंध ट्रेन क्रमांक १२१०५ (CSMTगोंदिया विदर्भ एक्सप्रेस) मधील चोरीच्या प्रकरणाशी असल्याचे निष्पन्न झाले असून, GRP/चाळीसगाव यांनी नोंदवलेल्या प्रकरणात पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्याला सुपूर्द करण्यात आले.

तसेच दिनांक २० फेब्रुवारी २०२६ रोजी परभणी रेल्वे स्थानकावर ट्रेन क्रमांक १७६१८ (नांदेड छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई तापोवन एक्सप्रेस) आगमनावेळी चोरी करण्याचा प्रयत्न करत असताना दोन संशयित महिला आरोपींना अटक करण्यात आली. GRP/परभणी यांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

ऑपरेशन अमानत अंतर्गत, जालना व नांदेड येथील RPF कर्मचाऱ्यांनी प्रवाशांचे हरवलेले सामान तत्काळ शोधून त्यांना परत केले. ट्रेन क्रमांक १७०५७ देवगिरी एक्सप्रेसमध्ये राहून गेलेला रू. १३,०००/- किमतीचा मोबाईल फोन शोधून जालना येथे योग्य मालकाकडे सुपूर्द करण्यात आला. याशिवाय, रू. ६,०००/- किमतीच्या मौल्यवान वस्तू असलेली विसरलेली बॅग नांदेड येथे एका ज्येष्ठ नागरिक प्रवाशाला सुरक्षितरीत्या परत करण्यात आली.

या यशस्वी कारवायांमुळे RPF व GRP पथकांची सतर्कता, समन्वय व समर्पण स्पष्टपणे दिसून येते, ज्यामुळे प्रवाशांची सुरक्षितता आणि त्यांची मालमत्ता संरक्षित ठेवली जाते.

सर्व प्रवाशांना सुरक्षित व निर्धोक रेल्वे प्रवासासाठी सतर्क राहण्याचे व सहकार्य करण्याचे आवाहन नांदेड विभागातील रेल्वे संरक्षण बलाने केले आहे.

स्थानकांवर व गाड्यांमध्ये आपल्या सामानावर लक्ष ठेवा, मोबाईल फोन, बॅग किंवा मौल्यवान वस्तू कुठेही बेवारस ठेवू नका, अनोळखी व्यक्तींशी प्रवासाची माहिती किंवा वैयक्तिक तपशील शेअर करू नका, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रतीक्षागृह, प्लॅटफॉर्म व गर्दीच्या डब्यांमध्ये संशयास्पद हालचालींबाबत सतर्क राहा. कोणतीही संशयास्पद व्यक्ती, बेवारस वस्तू किंवा चोरीचा प्रयत्न तात्काळ ड्युटीवरील RPF/GRP कर्मचाऱ्यांना कळवा. त्वरित मदतीसाठी १३९ (रेल्वे हेल्पलाईन) वर कॉल करा किंवा जवळच्या RPF चौकीशी संपर्क साधा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## होळीनिमित्त विशेष गाड्यांचे संचलन

**नांदेड (प्रतिनिधी)** –होळीनिमित्त होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेवून नांदेड, पूर्णा, हिंगोली, अकोला मार्गे तिरुपती मदार जंक्शन आणि चेरलापल्ली –मदार जंक्शन दरम्यान विशेष गाड्या चालवीण्यात येणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

गाडी क्र. ०७५१९ तिरुपती मदार जंक्शन सोमवार, दि. २ मार्च २०२६ तिरुपती ०९:५० मदार जंक्शन १५:३५, गाडी क्र. ०७५२० मदार जंक्शन तिरुपती गुरुवार, ५ मार्च २०२६ मदार जंक्शन ०८:२० तिरुपती ११:३०, गाडी क्र. ०७११९ चेरलापल्ली –मदार जंक्शन शनिवार, दि. २८ फेब्रुवारी चेरलापल्ली २३:४५ मदार जंक्शन १५:३५, गाडी क्र. ०७१२० मदार जंक्शन चेरलापल्ली मंगलवार, दि. ३ मार्च २०२६ मदार जंक्शन ०८:२० चेरलापल्ली २३:२०.

## तरोडा बुद्रुक येथे संत गाडगेबाबा जयंती साजरी

**नांदेड (प्रतिनिधी)**– राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त सोमवार, दि. २३ फेब्रुवारी रोजी नांदेड शहरात विविध ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील तरोडा बुद्रुक भागातील कॅनाल रोडवर असलेल्या संत गाडगेबाबा चौकात अभिवादन सोहळा पार पडला.

कार्यक्रमास अखिल भारतीय परिट/धोबी समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष बालाजी शिंदे, पत्रकार आनंद कल्याणकर, माजी नगरसेवक विनायक सगर, सचिन देशमुख तरोडेकर, सुरज सोनेकर, बळवंत तेलंग, हणुमंत तेलंग, नवनाथ भंडारे, प्रा. एस. एस. जाधव, बालाजी ईबितवार, राहुल चिंतलवाड आदी उपस्थित होते.

शहरातील महात्मा फुले चौक आणि तरोडा खुर्द येथील संत गाडगेबाबा चौकात रक्तदान शिबीर व अन्नदान कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित वक्त्यांनी गाडगेबाबा यांच्या समाज प्रबोधनात्मक कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता अभियान आणि समाजसेवा यासाठी आयुष्य वेचणारे गाडगेबाबा हे खऱ्या अर्थाने लोकसंत होते. त्यांच्या आदर्शांचे आजच्या काळात अनुकरण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले.

## पत्रकार अहेमदभाई करखेलीकर यांचे निधन

**भोकर (प्रतिनिधी)** – मागील तीन दशकांपासून पत्रकारितेत सक्रिय असलेले ज्येष्ठ पत्रकार अहेमदभाई करखेलीकर यांचे सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजताच्या दरम्यान दीर्घ आजाराने निधन झाले.

गेल्या अनेक महिन्यांपासून अहेमदभाई हे गंभीर आजाराने ग्रस्त होते. त्यांच्यावर उपचार सुरू होते, मात्र उपचारादरम्यान सोमवारी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात तीन भाऊ आणि एक बहीण व बारा पुतणे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता भोकर येथील उमरी रोड ईदगाह मैदान येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. अहेमदभाईंच्या निधनाने एक निर्भिड व हवळ्या मनाचा पत्रकार गमावला आहे, अशा भावना त्यांच्या सहकारी पत्रकारांनी व्यक्त केल्या आहेत.

## लक्ष्मीबाई कानिंदे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनीधी)** – हिमायतनगर तालुक्यातील एकंबा येथील रहिवाशी लक्ष्मीबाई खंडुजी कानिंदे (९६) यांचे सोमवार, दि. २३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी

४ वाजता वृद्धापकाळाने एकंबा येथील राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले, मुली, जावई, सुना, नातू, पणतू असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर २४ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता एकंबा ता. हिमायतनगर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या निधनाबद्दल अनेकांनी दुःख व्यक्त केले.

इंजि. भरतकुमार कानिंदे यांच्या आई, इंजि. अशोकराव येरेकर यांच्या त्या सासू होत.

## अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली

**किनवट (प्रतिनिधी)** – तालुक्यात रविवार, दि. २२ फेब्रुवारी रोजी रात्री तसेच सोमवारी सायंकाळी अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. सध्या रब्बीचा हंगाम अंतिम टप्प्यात असताना होणाऱ्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

आठवडाभरापासून हळूहळू उन्हाची तीव्रता वाढत असतानाच रविवारी रात्री साडे अकराच्या दरम्यान तालुक्यात विविध ठिकाणी अचानक अवकाळी पावसाला सुरुवात झाली. आधी १५ ते २० मिनिटे पावसाची साधारण हजेरी लागल्यानंतर पहाटे २ नंतर पुन्हा मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. त्यानंतर सोमवारी सायंकाळी ४ नंतर पुन्हा वातावरणात बदल होवून वादळवाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. अचानक आलेल्या पावसामुळे शिवारातील हरभरा, गहू, मका आदी हाताशी आलेली पिके धोक्यात आली आहेत. अवकाळी पावसाचा फळबागांनाही फटका बसला. सध्या सर्वत्र आंबा मोहोरला असताना पाऊस व वाऱ्यामुळे आंब्याचेही नुकसान होत आहे.

## पंढरीनाथ बोकारे यांना ‘जीवन गौरव पुरस्कार’

स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर्स असोसिएशन

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील ज्येष्ठ पत्रकार तथा नानक साई फाऊंडेशनचे अध्यक्ष पंढरीनाथ बोकारे यांना वरोरा येथे आयोजित पत्रकारांच्या एकदिवसीय अधिवेशनात ‘जीवन गौरव पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. हा सन्मान स्मॉल अँड मिडीयम न्यूजपेपर असोसिएशन, महाराष्ट्र तर्फे वरोराच्या नगराध्यक्षा अर्चना ठाकरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या अधिवेशनास असोसिएशनचे अध्यक्ष उत्तमराव वाडकर, सचिव ईश्वरसिंह सेंगर, कार्याध्यक्ष योगेश तुरेराव, राज्याध्यक्ष संतोष धरमकर, राज्य सचिव आशिष घूमे, मुकेश जिवतोडे, अतुल कोल्हे, भारती मुरकुटे, धनंजय उमरीकर, विश्वासराव अरोटे शिर्डी, जे.एच.पिन्नलवार, पुरुषोत्तम झाडे, अशोक सातपुते, भोयर, विजापूर एम.एस.मलाबवडी,गोपाळ कुलकर्णी, दाजी पाटील, बंडू मानकर यांसह राज्यभरातील पत्रकारांची उपस्थिती होती.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com